वृषाली जोशी

स्टीफन झ्वाइग

# बुद्धिबळाची गोष्ट



# बुद्धिबळाची गोष्ट

मूळ लेखक – स्टीफन झ्वाइग

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# बुद्धिबळाची गोष्ट

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# बुद्धिबळाची गोष्ट

लेखक : स्टीफन झ्वाइग
अनुवादिका: वृषाली जोशी
चलभाष : ९९२१७४६२४५
इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# स्टीफन झ्वाइग



दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी, ब्राझील येथील तुरुंगात जर्मन लेखक स्टीफन झ्वाइग याने लिहिलेली ‘बुद्धिबळाची गोष्ट’ ही जगप्रसिद्ध कादंबरी आहे. तिचे अनेक भाषात भाषांतर झाले व अनेक प्रती विकल्या गेल्या. ही बुद्धिबळातील लोकप्रिय, श्रेष्ठ साहित्यकृती समजली जाते.

स्टीफन इ्वाइग हा १८८१ मध्ये ऑस्ट्रीया येथे जन्मला. व्हिएन्नामध्ये वाढला. तो थोर कादंबरीकार, नाटककार व पत्रकार होता. १९४२ साली तो ब्राझील येथे मृत्यु पावला.

डॉ बी या कादंबरीतील मुख्य पात्राचा नाझी एकांतवासात डांबून छळ करतात. याच्या वाईट नशिबाला खिळून वाचक हे पुस्तक वाचत रहातो. एक पुस्तक चोरून डॉ बी बुद्धिबळाच्या दुनियेत स्वतःला हरवून वेडा व्हायला लागतो. त्याच्या सुटकेनंतर जहाजावर त्याची जगज्जेता बुद्धिबळपटु झेन्टोव्हिक याच्याशी गाठ पडते व तो त्याच्या तोडीस तोड निघतो. या दोघांमधील लढत ही प्रतिकात्मक रीत्या संस्कृती, शिक्षण व बुद्धी असलेला डॉ बी व जागतिक समाजवादाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, फक्त पैशात व सत्तेत रुची असलेला झेन्टोव्हिक यांच्यामधील लढत आहे.

# बुद्धिबळाची गोष्ट



न्यूयॉर्कहून ब्युनोस एअर्स येथे जाण्यासाठी रात्री सुटणाऱ्या मोठ्या पॅसेंजर बोटीमध्ये नेहमीप्रमाणे शेवटच्या घटकेचा गडबड गोंधळ चालला होता. काठावरील प्रवासी त्यांच्या मित्रांचा निरोप घेण्यासाठी गोंधळून एकमेकांना ढकलत होते. टोकदार टोप्या घातलेली तार देणारी मुले नावाचा पुकारा करत, रांगांमधून धक्के देत फिरत होती. फुले आणि पेट्या वाहून नेल्या जात होत्या. चौकस मुले मित्रांच्या रस्त्यातून वरखाली धावत होती. सर्व वेळ डेकवर वाद्यवृंद वाजत होता. मी या कोलाहलापासून थोडा दूर माझी ओळख असलेले, लोक जमलेल्या डेकवर उभा होतो. आमच्या जवळील दोन तीन चमकते दिवे प्रखर झाले --- बोट सुटण्यापूर्वी बातम्या जमवणारे वार्ताहर, खास लोकांची मुलाखत घेत होते व फोटो काढत होते. माझा मित्र माझ्याकडे बघून हसला. “तो तिथे बसलेला एक क्वचित दिसणारा झेन्टोव्हिक नावाचा दुर्मिळ पक्षी आहे.” मी ही बातमी मख्खपणे ऐकली असणार, कारण त्याने स्पष्टीकरण द्यायला सुरवात केली. “जागतिक बुद्धिबळपटु मिर्को झेन्टोव्हिक! त्याने अमेरिकेच्या या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत बुद्धिबळ स्पर्धा खेळल्या

आहेत आणि आता तो नवीन विजयप्राप्तीसाठी अर्जेन्टिनामध्ये चालला आहे.”

खरे तर मला आता तो तरुण जगज्जेता आठवला आणि त्याच्या करीयरमधील काही चमकदार ठळक गोष्टी आठवल्या. पण माझ्यापेक्षा जास्त चिकाटीने वर्तमानपत्र वाचणारा माझ्या मित्राला खूप प्रसंग आठवत होते. अलेखिन, कॅपाब्लान्का, टार्टाकोवेर, लास्कर आणि बोगोलजुबोव्ह यांच्यासारखा बुद्धिबळाच्या कलेतील निष्णात खेळाडूंमध्ये झेन्टोव्हिकचा सुमारे एक वर्षापूर्वी, एका रात्रीत समावेश झाला होता. १९२२ मधील बुद्धिबळ स्पर्धेतील झगमगत्या गोलात पूर्णपणे अनभिज्ञ अशा सात वर्षाच्या प्रज्ञावंत रेशेव्हस्कीचा मोठा जाणीवपूर्वक समावेश झाल्यापासून, असे झाले नव्हते. झेन्टोव्हिकमधील बुद्धिमान गुण डोळे दिपवणारे करीयर करतील, असे कुणाला नक्कीच वाटले नव्हते. लवकरच असे दिसू लागले, की झेन्टोव्हिक बुद्धिबळपटु असेल किंवा नसेल परंतु त्याला खासगीमध्ये कुठल्याही भाषेत एकही वाक्य धडपणे लिहिता येत नसे. त्याचा एक चिडलेला सहाध्यायी म्हणाला, “इतर बाबतीतही त्याचे अज्ञान तसेच होते.”

झेन्टोव्हिकचे वडील युगोस्लॅव्हीयन असून, डॅन्यूब नदीतील कफल्लक नावाडी होते. एका धान्यांनी भरलेल्या जहाजाने

त्यांच्या बोटीला सुनसान जागी धक्का दिल्याने, बोटीचा चुराडा होऊन, ते ठार झाले. त्यावेळी या बारा वर्षाच्या मुलाला एका धर्मोपदेशकाने दयेपोटी ताब्यात घेतले. त्या दयाळू माणसाने त्या रुंद भुवयावाल्या, जाड्या, अबोल मुलाला गावातील शाळेत जे शिकता आले नाही, ते घरी शिकवले.

पण धर्मोपदेशकाचे प्रयत्न वाया गेले. त्या मुलाला शंभर वेळा मुळाक्षरे शिकवली तरी तो त्यांच्याकडे असे रोखून बघत बसे, जसे काही त्याने ती कधी पाहिलीच नाहीत. कितीही सोपा विषय असो, त्याचे डोके मेहनत करूनही काही लक्षात ठेवत नसे. चौदाव्या वर्षीही तो बोटे मोजत असे व कुमार वयात आल्यावरही तो पुस्तके वा वर्तमानपत्रे मोठ्या मुश्किलीने वाचत असे.

तरीही मिर्को विरोधक होता वा हे मुद्दाम करत होता, असे म्हणता येत नसे. त्याला जे सांगू, ते तो आज्ञाधारकपणे करत असे. पाणी वाहून आणणे, लाकडे फोडणे, शेतात मदत करणे, स्वयंपाकघर स्वच्छ करणे ही सगळी कामे तो विश्वासार्हतेने [जरी राग येईल इतक्या मंद गतीने] पूर्ण करे. पण चांगल्या माणसाला कसली चीड येत असे, तर ती म्हणजे त्या विचित्र मुलाचे औदासिन्य! त्याला मुद्दाम सांगितल्याशिवाय तो काही करत नसे. कधीही प्रश्न विचारत नसे. इतर मुलांबरोबर खेळत नसे. आपण

होऊन काही करत नसे. एकदा मार्कोची कामे संपल्यावर, तो उदासीनतेने, कुरणातील शेळीच्या भकास नजरेने घरात बसून रहात असे. त्याच्याभोवती काय चालले आहे, त्यात त्याला जराही उत्सुकता नसे. धर्मोपदेशक संध्याकाळी त्याचा लांब पाईप ओढत, तेलकट आणि अनाकर्षक केसवाल्या स्थानिक तरुण पोलीस अधिकाऱ्याबरोबर त्याचे बुद्धिबळाचे ठराविक तीन खेळ खेळत असे. तो मुलगा त्याच्या जड पापण्यांच्या आडून, बुद्धिबळाच्या पटाकडे झोपाळूपणे व बेफिकीरीने निरखून बघत बसे.

एका हिवाळ्यातील संध्याकाळी, दोघे खेळाडू त्यांच्या रोजच्या खेळात रंगून गेले होते. गावातील रस्त्यावरून बर्फाच्या गाडीच्या घंटांचा आवाज मोठा मोठा होत होता व वेगही वाढत होता. डोक्यावरील धुळीने भरलेल्या टोपीसकट एक शेतकरी घाईघाईने चालला होता --- त्याची आई मरायला टेकली होती आणि त्याला धर्मोपदेशकाने लगेच त्याच्याबरोबर आईचे शेवटचे विधी करण्यासाठी यायला हवे होते. काही आढेवेढे न घेता धर्मोपदेशक त्याच्याबरोबर गेला. तो जातांना तरुण पोलीस अधिकारी बिअर पिताना व पाईप ओढताना व त्याचे जड बूट

घालत होता. तेव्हा त्याने पाहिले की मार्कोचे लक्ष त्या अपूर्ण अवस्थेतील बुद्धिबळाच्या पटाकडे लागलेले होते.

त्या झोपाळू मुलाला पटावरील एकही सोंगटी योग्य रीतीने हलवता येणार नाही अशा खात्रीने, तो विनोदाने बोलला, "तुला हा खेळ पूर्ण करायचा आहे, नाही का?" मुलाने लाजून वर बघितले व मान हलवत धर्मोपदेशकाची जागा घेतली. चौदा खेळींनंतर पोलीस अधिकाऱ्याचा पराभव झाला. त्याने निष्काळजीपणे एकही खेळी खेळलेली नसूनही, त्याला हार मानावी लागली. दुसऱ्या डावातही त्याचा पराभव झाला.

परतल्यावर धक्का बसलेल्या धर्मोपदेशकाने 'बालाम [जुन्या टेस्टॅमेंटमधील साधू ] चे गाढव' अशी शिवी हासडत, बायबलची फार माहिती नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याला स्पष्ट केले की दोन हजार वर्षांपूर्वी बायबलमध्ये एका मुक्याला अचानक शहाणपणे चुरूचुरू बोलायची शक्ती कशी येते, ते सांगितले. उशीर झाला असला तरी, त्याच्याकडे रहाणाऱ्या यःकश्चित मुलाने पोलीस अधिकाऱ्याला सहज हरवावे, हे न पटल्याने त्याने मार्कोबरोबर नवीन डाव मांडला. एकदाही त्याचे डोके वर न करता तो अतिशय चिवटपणे, संथपणे व शांतपणे खेळू लागला. तो अजिंक्य ठरणार अशा खात्रीने खेळत होता. पण येणाऱ्या काही

दिवसात तो व पोलीस अधिकारीदेखील मार्कोला हरवू शकले नाहीत.

धर्मोपदेशकाला त्याचा विद्यार्थी इतर बाबतीत किती ढ आहे, हे माहिती होते. पण मार्कोचे बुद्धिबळातील कौशल्य पाहून, त्याला मुलाला अजून चांगले शिकवायची इच्छा झाली. मार्कोचे गबाळे सोनेरी केस गावातील सलूनमध्ये कापून त्याला थोडे ठीकठाक केल्यावर, तो त्याला बर्फाच्या गाडीतून शेजारील लहानशा गावात घेऊन गेला. तिथे मुख्य चौकातील एका उपहारगृहातील कोपऱ्यात घेऊन गेला. तिथे बुद्धिबळातील दादा लोक बसलेले होते. त्यांच्याइतका तो स्वतः निष्णात नव्हता. मेंढीच्या कातडीचा फरकोट घातलेल्या, उंच डोक्याच्या, गुलाबी गालाच्या पंधरा वर्षांच्या छान बूट घातलेल्या मार्कोला त्या लोकांसमोर पेश केले तेव्हा त्यांच्यामध्ये काहीच खळबळ माजली नाही. त्याला कुणीतरी बुद्धिबळाच्या टेबलाशी हाक मारेपर्यंत, तो मुलगा तिथे लाजून, मान खाली घालून उभा राहिला. त्याच्या पहिल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर मार्को हरला. कारण त्याने घरच्या खेळात कधीच ‘सिसिलियन सुरवात’ पाहिली नव्हती. दुसरा डाव त्याने कसलेल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर मांडला.

तिसऱ्या व चौथ्या डावापासून, त्याने एकामागोमाग एक सगळ्यांना हरवले.

आता युगोस्लाव्हीयासारख्या लहान देशात काही खळबळजनक होणे ही तशी दुर्मिळ गोष्ट पहिल्यांदाच झाल्याने, तिथे जमलेल्या ग्रामीण लोकात ती तात्काळ पसरली. हा आश्चर्यकारक मुलगा इथे निदान उद्याचा दिवस तरी रहावा, असे सर्वांचे एकमत झाले. म्हणजे तेथील बुद्धिबळ संघाचे लोक व बुद्धिबळाचे वेड असलेला वयस्क सरदार सिम्सझिक हा पण तिथे पोचेल. धर्मोपदेशकाने त्याच्या चेल्याकडे मोठ्या अभिमानाने पाहिले, ते नवीनच वाटत होते. पण त्याच्या आनंदाच्या शोधात त्याला त्याचे रविवारचे चर्चमधील कर्तव्य विसरायचे नव्हते. त्याने मार्कोला ठेऊन घेण्यास परवानगी दिली. तरुण झेन्टोव्हिकला बुद्धिबळ संघाच्या खर्चाने एका हॉटेलमध्ये ठेवण्यात आले. त्यादिवशी त्याने पहिल्यांदा पाण्याचा कृत्रिम तलाव  पाहिला. दुसऱ्या दिवशी दुपारी हॉटेलातील बुद्धीबळ खेळायच्या खोलीत, गर्दी जमली होती. मार्को अचलपणे पटासमोर चार तास बसलेला होता. वर न बघता व तोंडाने एकही शब्द न उच्चारता, त्याने अनेकांना हरवले. नंतर तशाच प्रकारचा एक खेळ खेळायचे ठरले. तो खेळ त्या मुलाला समजावून

सांगण्यात आला. तो एकटा विरुद्ध अनेकजण असा तो सामना झाला. पण एकदा मार्कोला तो खेळ समजल्यावर, तो भराभर खेळू लागला. तो या टेबलाकडून त्या टेबलाकडे जात राहिला. त्याचे जड बूट वाजत होते. नंतर त्याने आठपैकी सात डाव जिंकले.

यावेळी मोठी चर्चा सुरु झाली. खरे तर हा नवीन जेता तिथे रहाणारा नव्हता, तरी स्थानिक जल्लोष सुरु झाला. कदाचित नकाशातील नगण्य असणाऱ्या त्या गावात, एक आंतरराष्ट्रीय महत्वाचा खेळाडूं अभिमानाचा विषय ठरला.

गॅरीसनमध्ये मौजमजेसाठी नेमल्या गेलेल्या लोकप्रिय गाणी गाणाऱ्या गायिकेचा एक केवळ दलाल असणारा कोलर याने जाहीर केले की वर्षभर बक्षीस वा सूट म्हणून, या तरुणाला व्हिएन्ना मधील प्रवीण अशा व्यावसायिकांकडून बुद्धिबळाचे प्रशिक्षण दिले जाईल. आतापर्यंत गेल्या साठ वर्षात इतक्या उल्लेखनीय खेळाडूला न पाहिलेल्या वयस्क सरदार सिम्सझिक याने ताबडतोब रक्कम लिहून टाकली. त्या दिवसापासून नावाड्याच्या मुलाचे दैदीप्यमान करीयर सुरु झाले

जरी नंतर लक्षात आले की व्यावसायिक वर्तुळात विशेष प्रकारच्या मर्यादा राहिल्या आहेत, तरी सहा महिन्यांत मार्को

झेन्टोव्हिकने बुद्धिबळातील सर्व तंत्रे आत्मसात केली. कारण त्याने फक्त स्मरणशक्तीवर अवलंबून एकही खेळ खेळला नाही --- त्याला व्यावसायिक मंडळी ‘आंधळा’ म्हणत. युद्धाच्या अथांग राज्याच्या रणांगणात फक्त कल्पनेच्या सहाय्याने खेळणे त्याने टाळले. तो जगप्रसिद्ध झाला तरी पटावरील चौसष्ठ काळी पांढरी घरे व बत्तीस सोंगट्या त्याने सतत नजरेसमोर ठेवल्या. तो घडी केलेला बुद्धीबळाचा पट नेहमी खिशात ठेवत असे. जेणेकरून त्याला एखादा खेळ परत खेळून बघायचा असेल किंवा एखादा प्रश्न सोडवायचा असेल, तर त्याला सोंगट्यांची ती जागा डोळ्यांनी बघून करणे शक्य व्हावे. यामुळे जरी एखादा मुद्दा लहानसा वाटला, तरी कल्पनाशक्तीवर अवलंबून रहाण्याने होणारी फसवणूक टाळली गेली. कसबी खेळाडूंबरोबर प्रत्यक्ष चर्चा करता आली. हे कसलेल्या कलावंताने त्याच्या तोडीच्या मंडळींमध्ये आपापसात चर्चा करून, रसिकांची वाहवा मिळवणारे गाणे वा बजावणे पेश करण्यासारखे झाले. पण ही विचित्र प्रतिक्रिया मार्कोची घोडदौड खच्ची करण्यास कारणीभूत ठरली नाही. सतरा वर्षे वयात त्याने एक डझन बक्षिसे मिळवलेली होती. अठराव्या वर्षी हंगेरियन विजेतेपद मिळवले होते. आणि विसाव्या वर्षी तो जगज्जेता ठरला होता. जसे नेपोलिअनपुढे जाड्या, निष्क्रिय कुटूझोव्हने वा बिन्स पेरणाऱ्या हनीबल शेतकऱ्याने [

ज्याने लीव्हीच्या अहवालानुसार, लहानपणी अत्यंत मूर्खासारखे नाकातून गळणाऱ्या शेंबडाचे गुण उधळले होते ] शरणागती पत्करावी, तसे नवल वाटेल असे धोके पत्करून, त्याच्यापेक्षा बुद्धिमत्तेने, कल्पकतेने व साहसाने अमाप वरचढ असलेले कसलेले खेळाडू त्याच्या थंड व अथांग तर्कशक्तीपुढे, हतबल होत.

तर अशा तऱ्हेने बौद्धीक वर्तुळाबाहेरील एका मंद, मुखदुर्बळ नावाड्याच्या मुलाने गाजलेल्या, अति बुद्धिमान, तत्वज्ञ, गणिती, नैसर्गिक रित्या आकडेमोडीत माहीर असणाऱ्यांना, कल्पक, प्रतिभावंत अशा बुद्धिबळात प्राविण्य मिळवलेल्या गटाला पहिल्यांदाच मागे टाकले. परंतु अगदी रंगवून बातम्या सांगणाऱ्या पत्रकारितेतील वार्ताहरांनादेखील यात काही सापडले नाही. अर्थात, झेन्टोव्हिकने वर्तमानपत्राच्या चमकदार भाषेला नकार दिला तेव्हा त्याच्याबद्दल व्यक्तिशः असलेले प्रसंग छापले गेले. उदाहरणार्थ, जेव्हा तो बुद्धीबळाच्या पटावरून उठला व आसपास कोणी नव्हते, तेव्हा जरी त्याने काळा सूट, छानसा टाय व मोत्याची पिन घातली असली व मोठ्या कष्टाने बोटांची नखे सुंदर ठेवली असली, तरी तो बदलता येणार नाही असे, कुरूप / विनोदी

पात्र ठरला. त्याचे वागणे व हालचाली धर्मोपदेशकाचे घर झाडणाऱ्या साध्या गावाकडील मुलाच्याच राहिल्या.

व्यवसायातील त्याच्या मित्रांचे मनोरंजन व त्रास पाहिला तर तो कलाशून्य व निर्लज्ज होता. चिकू म्हणण्यापेक्षा खालच्या दर्जाची हाव असलेला होता. त्याच्या बुद्धिबळातील विशेष प्राविण्यामुळे, जितके पैसे मिळतील तेवढे तो ओरबाडून घेई. शहराशहरांमधून हिंडताना नेहमी स्वस्त हॉटेलांमध्ये रहात असे. त्याला पैसे देणाऱ्या दयनीय क्लबमधूनही तो खेळे. साबणांच्या जाहिरातीत काम करे. त्याला धड तीन वाक्येदेखील बोलता येत नाहीत, हे माहिती असणाऱ्या, त्याच्याशी स्पर्धा करणाऱ्यांच्या चेष्टेलाही तोंड देई. स्पेनमधील गॅलेशिया देशातील एका अप्रसिद्ध विद्यार्थ्याने कुणा हरहुन्नरी प्रकाशकासाठी लिहिलेले ‘बुद्धिबळाचे तत्वज्ञान’ या पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी त्याने त्याचे नाव विकले होते. त्याला सर्व प्रकारच्या डोकेबाजांप्रमाणे, टर उडवण्याचे मुळीच अंग नव्हते. जागतिक स्पर्धांमधील विजयापासून, झेन्टोव्हिकला तो स्वतः जगातील सर्वात महत्वाचा माणूस वाटे. सर्व हुशार व बुद्धिमान वक्त्यांना व लेखकांना हरवले असल्याचा व त्यांच्याहून अधिक पैसे मिळवल्याचा त्याला अभिमान वाटे.

त्याची पहिली स्वाभिमान वाटत नसल्याची स्थिती जाऊन, तो त्याचा थंड अभिमान न लपवता सतत दाखवू लागला.

झेन्टोव्हिकचे पोरकट चाळे व अरेरावी वृत्तीची उदाहरणे देतांना माझ्या मित्राने निष्कर्ष काढला, 'अशा वेगाने मिळालेल्या प्रसिद्धीमुळे, त्याचे रिकामे डोके गुंडाळले गेले का?' सपाट शेतजमिनी असलेल्या गावातील एकवीस वर्षांचा मुलगा लाकडी पटावरील काही तुकडे मागे पुढे हलवून, आठवड्याभरात खूप पैसे मिळवतो. घरी असतांना तो करत असे ते पाठ मोडणारे लाकूडतोड्याचे खालच्या दर्जाचे काम करून, सबंध वर्षात मिळणाऱ्या पैशांपेक्षा ते खूपच जास्त नसतील का? रेम्ब्रान्ट, बिथोविन, डान्टे, नेपोलिअन पूर्वी होऊन गेले असले तरी आपण थोर आहोत, असा विचार करणे खूपच सोपेही नसते का? या मुलाच्या चमचमणाऱ्या मेंदूत फक्त एका प्रकारचे ज्ञान आहे आणि त्यामुळे गेल्या अनेक महिन्यांमध्ये तो एकही बुद्धिबळाचा खेळ हरलेला नाही. पण बुद्धिबळ आणि पैसे हे सोडून, जगात दुसऱ्याही अनेक महत्वाच्या गोष्टी आहेत, याची त्याला काही कल्पना नाही. तो स्वतःवर फारच खूश आहे.

माझ्या मित्राच्या निरीक्षणामुळे, माझ्यात विशेष कुतूहल जागृत झाले. सर्व आयुष्यभर मी मानसिक कमकुवतपणामध्ये

वेड्यासारखी रुची घेणारा होतो. एखाद्या कल्पनेने लोक झपाटून जातात. माणूस स्वतःला जितका आखडून घेतो, तितका तो अपरिमिततेच्या जवळ जातो. हे लोक या जगातले वाटत नाहीत.

ते स्वतःच्या विशिष्ट सामानांनी कसरीसारखे छोटे बिळ कुरतडत जातात. जगाची विचित्र लहानशी, वैयक्तिक प्रतिमा तयार करतात. रियोच्या बारा दिवसाच्या सफरीत, जगावेगळा नमुना असणाऱ्या अशा एकारलेल्या मनाची जवळून परीक्षा करायचा माझा इरादा मी गुप्त ठेवला नाही.

पण माझ्या मित्राने बजावले, “तुझे नशीब फार चांगले नसेल. मला जितके माहिती आहे त्यानुसार, आजपर्यंत झेन्टोव्हिकची थोडीही मानसिक रुची जाणून घेण्यात कुणी यशस्वी झाले नाही. तो फायदा मिळवण्यात हुशार शेतकरी, त्याच्या वाईट मर्यादांसकट अतिशय शिष्ट आहे. तो कधीही काही निसटू देत नाही --- फक्त लहान हॉटेलांमध्ये सापडणाऱ्या त्याच्यासारख्या परिस्थितीतील देशभक्त सोडून, सर्वांबरोबरचे संभाषण टाळायच्या साध्या तंत्राचे आभार! जेव्हा त्याला कुणी सुशिक्षित माणसाचा वास लागतो, तेव्हा तो त्याच्या कोशात शिरतो. अशा तऱ्हेने कुणीही अशा बढाया मारू शकणार नाही, की आम्ही त्याला

मूर्खासारखे काही बोलताना वा त्याचे अथांग अज्ञान उघडे पडतांना पाहिले.

खरे तर माझ्या मित्राचे बरोबर निघाले. सफरीच्या पहिल्या काही दिवसात, हे सिद्ध करणे अशक्य झाले, की झेन्टोव्हिकला गाठून त्याला माझ्याशी बोलायला भाग पाडणे, हे माझ्या एकंदर स्वभावात बसणारे नव्हते.

तो लांब ढांगा टाकत, गर्दी असलेल्या डेकवर फिरे. पण नेहमी शिष्टपणे स्वतःमध्ये गुंग असे. नेपोलिअनच्या प्रसिद्ध रुबाबात हात मागे बांधलेले असत. आणि त्याचे हे चालणे तो धावल्यासारखे इतके घाईने व भरभर करे, की त्याला गाठून त्याच्याशी बोलणे अशक्य असे.

तो कधी बार, लॉबी, सिगरेट ओढायच्या खोलीमध्ये रेंगाळत नसे. शिपायाकडे चौकशी केली तर तो असे सांगे, की तो दिवसाचा जास्त भाग त्याच्या केबिनमध्ये मोठ्या जड पटावर बुद्धिबळ खेळण्यात अथवा त्यासंबंधी गोष्टींचा आढावा घेण्यात घालवतो.

तीन दिवसांनंतर मला त्याच्या कठोर लपाछपीचा राग येऊ लागला, मी त्याच्या जवळ जायचे ठरवले होते. पण ते शक्य होत

नव्हते. मी माझ्या आयुष्यात कधी कुठल्या बुद्धिबळपटुशी ओळख करून घेतली नव्हती. अशा स्वभावाच्या व्यक्तीशी मी संवाद साधायचा जितका प्रयत्न करू लागलो, तितके ते मला चौसष्ठ काळया पांढऱ्या चौकोनांच्या राज्यात आयुष्यभरासाठी गुंतून पडलेले काहीसे अकल्पनीय असे वाटू लागले. माझ्या स्वतःच्या अनुभवावरून, मला त्या राजबिंड्या गूढ खेळाचे आकर्षण माहिती होते. माणसाने शोधून काढलेल्या खेळांपैकी हा एकमेव असा खेळ होता की ज्यात दुष्ट, जुलमी राजवटीपासून दूर जाऊन, त्यातील सुयश फक्त बुद्धिवंतांना, किंवा दैवी देणगी लाभलेल्या विशिष्ट प्रकारच्या बुद्धिवंतांना, मिळत असे. पण बुद्धिबळासारख्या तोकड्या खेळाला खेळ म्हणणे, म्हणजे खेळ या शब्दाचा अपमान नाही का? मुहम्मदच्या शवपेटीसारखे स्वर्ग व पृथ्वी यामध्ये लोंबणारे शास्त्र किंवा कला यामधील ते नाही का? पुरातन तरीही अगदी नवीन, दोन विरुद्ध गोष्टींमधील काही आगळे वेगळे नाही का? यांत्रिकपणे बनवलेले पण तरीही कल्पनेची उत्तुंग भरारी मारणारे नाही का? भौमितिक दृष्ट्या परिमेय क्षेत्राशी संबंधित असे, पण त्याच्या प्रकारात व उप प्रकारात अपरिमेय असणारे असे नाही का? नेहमी विकसित होत जाणारे, तरीही वंध्यत्व असलेले नाही का? काही निर्माण न करणारी रासायनिक क्रिया नाही का? काहीही आकडेमोड न करणारे

गणित नाही का? कलाकृती निर्माण न करणारी कला नाही का? भरीव असे काही न दाखवणारे वास्तुशास्त्र नाही का? असे असूनही पुस्तके व इतर कामांहून त्याच्या गाभ्यात जास्त टिकणारे नाही का? सर्व लोकांना, सर्व काळ सामावणारे, असले तरी हा खेळ पृथ्वीवर आणण्यात कंटाळा दूर करणे, मनाची एकाग्रता व शक्ती वाढवणे हा उद्देश आहे का, हे कुणालाच माहिती नाही. हे कुठे सुरु झाले, कुठे संपणार? कोणीही मुलगा त्याचे पायाभूत नियम शिकू शकतो. कोणी लिंबूटिंबू हे करून बघू शकतो. आणि तरीही न बदलणाऱ्या बुद्धिबळाच्या नियमांना धरून, त्यातील निष्णात मंडळी गुणवान असतातच. पण कवि, संगीतकार व गणितज्ञ, यांच्यामध्ये देखील कल्पकता, धीर व कसब हे विशेष प्राविण्याचे गुण असतात पण ते वेगवेगळ्या प्रमाणात वाटलेले असतात. पूर्वीच्या काळी, जेव्हा चारित्र्याचे निदर्शक असलेले भावनांचे शास्त्र, माणसाचा रागावरून ओळखले जायचे, तेव्हा जास्त धीट व उद्धट वागणूक असलेल्या माणसाने, अशा कसबी खेळाडूंच्या मेंदूतील करड्या भागाच्या घड्यांची रचना काही वेगळ्या प्रकारची आहे का, ते तपासले असते. मेंदूतील बुद्धीबळाशी संबधित स्नायू किंवा फुगवटा इतरांपेक्षा जास्त बळकट आहे का, हे तपासले असते. आणि झेन्टोव्हिकच्या केसमुळे, जास्त धीट व उद्धट वागणूक असलेल्या माणसाच्या

शंभर किलो वजनाच्या मेंदूतील खडकाळ भागात त्याला निखळ बुद्धिमान जडत्व असलेला एकमेव सोनेरी दोरा पुरलेला सापडला असेल, तेव्हा तो किती उद्दीपित झाला असेल!

तत्वतः नेहमी असे आढळते व हे समजायला सोपे आहे, की अशा एकमेव, हुशार खेळाने त्याचे स्वतःचे असे जादुगार निर्माण करावेत. तरी अशी कल्पना करणे किती कठीण व अशक्य आहे, की काळया पांढऱ्या चौकोनात जग सामावणाऱ्या, त्या खेळातील बत्तीस सोंगट्या मागे पुढे, या व त्या कडेला हलवण्यात धन्यता मानणाऱ्या, एखाद्या सरदाराला या खेळासाठी नवीन शिष्यवृत्ती देण्यास उद्युक्त करणाऱ्या, बुद्धिबळाच्या पुस्तकाच्या कोपऱ्यातील अमर अशा भागापेक्षा सोंगट्यांना जास्त महत्व देणाऱ्रा, असा बुद्धिमान माणूस त्याचे आयुष्य, वेडे न होता, दहा, वीस, तीस, चाळीस वर्षे त्याच्या विचारांची दिशा लाकडी राजाला कोंडीत पकडण्यासाठी वळवण्यात तन, मन, धन अर्पून समर्पित करतो!

अशी एक घटना, असा विचित्र चमत्कार किंवा गूढ मूर्ख असा प्रत्यक्ष खेळाडू पहिल्यांदाच माझ्या सहा केबिन पलीकडे माझ्या जहाजावर आहे, अरेरे! ज्याच्याबद्दलचे माझ्या मनातील कुतूहल वेड्यासारखे वाढत आहे, पण मी त्याला भेटू शकत नाही. कसे कुणाला फसवून हे साध्य करावे, असा विचार मी करू

लागलो. त्याच्या गौरवासाठी एका महत्वाच्या वर्तमानपत्रात, त्याची मुलाखत छापायची असल्याचा बहाणा करावा की स्कॉटलंडमध्ये फायदेशीर अशी स्पर्धा आयोजित करून, त्याच्या अस्मितेला धक्का लावून, त्याची हाव वाढवून, त्याला संपर्कात आणावे, अशा तरकिबी मी मनात लढवू लागलो. पण शेवटी मला शिकाऱ्याची युक्ती आठवली. नर सुतारपक्ष्याला फसवण्यासाठी मादीच्या आवाजात साद घालणे, हे हमखास विश्वासार्ह असलेले तंत्र होते.

त्या बुद्धिबळपटुचे लक्ष वेधून घेण्यासाठी, आपण स्वतःच बुद्धिबळ खेळणे, हाच परिणामकारक उपाय नव्हता का?

माझ्या आयुष्यात मी कधीच गंभीरपणे बुद्धिबळ खेळणारा नव्हतो. माझा या बाबतीतला माझा दृष्टीकोन फक्त गंमत म्हणून, फक्त वरवरचा होता. जर मी बुद्धिबळाच्या पटासमोर एक तास घालवला, तर ते मला दमवण्यासाठी नव्हे तर विरोधाभासात्मक रीत्या माझ्या ताण देणाऱ्या भावनांचा निचरा करण्यासाठी असेल. मी खऱ्या अर्थाने बुद्धिबळ 'खेळतो.' तर इतर मनापासून खेळणारे ते एक 'काम' म्हणून खेळतात. मी हा शब्द धीटपणे नवीन पद्धतीने वापरतो. या खेळात एक भिडू गरजेचा असतो. आणि त्यावेळेस मला माहिती नसते की तिथे अजून कोणी त्यात रुची

असणारे आहेत. मी सिगरेट ओढायच्या खोलीचा मोह पाडून त्याना तेथून हुसकतो. माझ्या बायकोचा खेळ माझ्यापेक्षा वाईट असूनही, ती व मी तिथे खेळत बसतो. कुणी जाणारा येणारा तिथे क्षणभर थबकतो. तिथे बसतो. आमच्या सहा खेळी होण्याआधीच तो तिथे बसायची परवानगी मागतो. शेवटी तो मला खेळायचे आव्हान देतो. त्याचे नाव मॅकोनोर असते. तो स्कॉटीश सिव्हील इंजनिअर असतो. त्याने कॅलीफोर्नियात तेलखोदाईमध्ये त्याचे नशीब घडवलेले असते. डोळयांना तो जाडसर, सरळ गालांचा, बळकट दातांचा दिसत होता. पण खूप दारू पिण्याने बहुधा नितळ त्वचेचा रंग लालसर झालेला होता. एखाद्या खेळाडूसारखे रुंद शक्तिमान खांदे होते पण दुर्दैवाने त्याचे खेळण्याचे चारित्र्यही त्यात उमटे. मिस्टर मॅकोनोर नेहमी स्वतःला दोष देत असे. एखाद्या फालतू खेळात हरल्यावर सुद्धा तो कानकोंडा होत असे. त्याला स्वतःच्या आयुष्याचे कठोर परीक्षण करायची सवय होती. मिळालेल्या यशाने तो बिघडे. पक्क्या मतांचा स्वयंभू मनुष्य स्वतःच्या अहंगंडाने इतका ठामपणे काही करण्यास उद्युक्त होई व जसे काही ते परवानगी नसलेले बंड असल्यासारखा कुठल्याही विरोधाने तो चिडे. ती भयंकर चिडकट कृती असे. जेव्हा तो पहिल्या खेळात हरला, तेव्हा तो मनातून नाराज होऊन क्षणभर लोकांसमोर एखाद्या हुकुमशहासारखी

जास्तच चिडचिड करू लागला. हे त्याचे लक्ष भरकटल्यामुळे झाले. तिसऱ्या खेळातही तो हरला, तेव्हा पुढच्या खोलीतून गडबडीचे आवाज ऐकून, त्याने स्वतःला दोष दिला. हा पराभव मान्य न करता त्याने ताबडतोब अजून एक डाव खेळायची मागणी केली. प्रथम या गंभीर मानभावीपणाने माझे मनोरंजन झाले. शेवटी त्या जगज्जेत्याला आपल्या टेबलावर आणण्याचा आपला खरा उद्देश सफल करायचा परिणाम मी मान्य केला

तिसऱ्या दिवशी बेत निदान काही अंशी यशस्वी झाला. झेन्टोव्हिकने डेकवरील गर्दीच्या जागेच्या खिडकीसारख्या भोकातून आम्हाला बुद्धिबळाच्या पटासमोर उभे असलेले पाहिले किंवा तो काही वेळासाठी सिगरेट ओढायच्या खोलीत गेला --- कुठल्याही प्रसंगी त्याने आम्हा दोघा नवख्यांना त्याच्या कलेचा सराव करतांना पाहिले, तेव्हा त्याला पटाकडे बघत पण आमच्या पासून अंतर ठेऊन, तिथे येणे भाग पडले.

मॅकोनोर निघालाच होता. आमच्यासारख्यांच्या शिकाऊ खेळात रुची घेण्याचे झेन्टोव्हिकसारख्या जगज्जेत्याला काही कारण नव्हते. पुस्तकाच्या दुकानात आमच्यापैकी कुणीही नैसर्गिकपणे वाईट रहस्यकथेचे पुस्तक न उघडता आसपास घुटमळेल, तसे तो आमच्या टेबलापासून दूर जाऊन सिगरेट

ओढायच्या खोलीतून बाहेर पडला. ‘त्याचे परीक्षण करायला गेल्यावर तो कमी प्रतीचा निघाला.’ त्याची थंड, दुर्लक्षित नजर पाहून मी जरा रागावलो. पण माझ्या रागाला वाट देण्यासाठी मॅकोनोरला म्हणालो,

“तुझ्याकडे त्या बुद्धिबळपटुचे लक्ष नाही आहे.”

“कोण बुद्धिबळपटु?”

मी त्याला समजावले की आता जो सद्गृहस्थ आपल्या खेळाकडे खूप तुच्छतेने पहात शेजारून गेला, तो बुद्धिबळपटु झेन्टोव्हिक होता.

मी पुढे बोललो की आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करू. त्याच्या अती दुर्लक्ष करण्याकडे आपण नाराज न होता बघू. भिकारी मला हे हवे किंवा ते हवे, असे म्हणू शकत नाहीत. पण नवल म्हणजे माझ्या या थंड शेऱ्यावर मॅकोनोरकडून फारच अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. लगेच तो रागावला व त्याने खेळ सोडून दिला. त्याच्या अभिमानाची थरथर तुम्हाला जाणवली असती. झेन्टोव्हिक तिथे असल्याचे त्याला माहिती नव्हते. झेन्टोव्हिकला त्याच्याबरोबर नक्की खेळायचे होते. तो त्याच्या आयुष्यात कधी जगज्जेत्या बरोबर खेळला नव्हता. फक्त एकदा दुसऱ्या चाळीसजणांबरोबर

एकत्रित खेळ खेळला होता. पण तो खेळ सुद्धा खूप उद्दीपक झाला होता आणि झेन्टोव्हिक जवळ जवळ जिंकलाच होता. मला तो जगज्जेता व्यक्तिशः माहिती होता का? मी म्हणालो, नाही. मी त्याच्याशी बोललो होतो का? त्याला कधी घरी बोलावले होते का? मी हे या पायावर नाकारले, की झेन्टोव्हिक कधी नवीन ओळखी करून घेण्याइतका मनमोकळा नव्हता. शिवाय आमच्यासारख्या तिसऱ्या दर्जाच्या खेळाडूंशी ओळख करून घ्यायचा त्रास झेन्टोव्हिकसारखा जगज्जेता का घेईल?

मॅकोनोरसारख्या गर्विष्ठ खेळाडूकडे मी तिसऱ्या दर्जाच्या खेळाडूबद्दल असा शेरा मारल्यामुळे तो रागावून बसला व अचानक अनपेक्षितपणे जाहीर केले की तो त्याच्यापुरता यावर विश्वास ठेऊ शकत नाही की झेन्टोव्हिक एखाद्या सभ्य माणसाचे आमंत्रण नाकारेल. त्याच्या विनंतीवरून, मी त्याला जगज्जेत्याचे थोडक्यात वर्णन करून सांगितले आणि आमचा खेळ संपवून, तो डेकवर झेन्टोव्हिकच्या मागे मोठ्या अधीरतेने धावला. मला परत वाटले की असा कोणीही रुंद खांद्याचा माणूस त्याने एकदा काही ठरवले की त्यापासून माघार घेणार नाही. मी काळजी करत राहिलो. दहा मिनिटांनी मॅकोनोर परतला. मला वाटले, तो चांगल्या मनस्थितीत नव्हता.

मी विचारले, “काय झाले?”

तो काहीसा रागाने उत्तरला, “तुझे बरोबर होते. तो काही फारसा चांगला सभ्य मनुष्य नाही. मी माझी ओळख करून दिली. मी कोण आहे, ते सांगितले. त्याने साधे हस्तांदोलन करण्याची सुद्धा पर्वा केली नाही. जर तो असा एखादा खेळ आमच्याबरोबर खेळला, तर आम्हाला किती अभिमान वाटेल, हे मी त्याला सांगायचा प्रयत्न केला. पण तोही तितकाच हट्टी होता. त्याचा नाईलाज होता. त्याच्या दौऱ्यामध्ये त्याला पैशांची प्राप्ती होत नसेल, तर कुठेही खेळायला हरकत घ्यायची, अशा सक्त सूचना त्याच्या दलालाला त्याच्या करारामध्ये त्याने दिलेल्या होत्या. त्याचा खेळाचा दर कमीत कमी दोनशे पन्नास डॉलर होता.

मी हसलो. ”काळे पांढरे तुकडे ढकलायचा मामला एवढा नफा मिळवून देणारा असेल, याची कुणाला कल्पना असेल? ठीक आहे मी आशा करतो, की तू नम्रपणे तिथून निघाला असशील.”

पण मॅकोनोर प्रामाणिकपणे म्हणाला, “उद्या दुपारी तीन वाजता सिगरेट ओढायच्या खोलीत खेळ ठरवला आहे. मी अशी आशा करतो की आपण इतक्या सहजतेने सोडून द्यायला नको.”

मी दुःखाने ओरडलो, “काय? तू त्याला दोनशे पन्नास डॉलर दिले आहेस?”

“का नाही? तो येईल. जर माझा दात दुखत असेल आणि तिथे दंतवैद्य उपलब्ध असेल, तर मी त्याला फुकटात माझा दात उपटायला सांगणार नाही.”

इतकी जबरदस्त फी लावणारा तो मनुष्य मोठा चालू आहे. प्रत्येक क्षेत्रातील तज्ञ मंडळी व्यवहारातही माहीर असतात. माझ्यासाठी जितका सरळ रोखठोक व्यवहार असेल तेवढा उत्तम! मिस्टर झेन्टोव्हिकचे ऋणी होण्यापेक्षा, मी त्याला सरळ नगद रक्कम देऊन टाकीन. तसेही आमच्या क्लबसाठी त्या संध्याकाळी माझे दोनशे पन्नासपेक्षा जास्त पैसे खर्च झाले आणि मी जगज्जेत्याला खेळवत नव्हतो. तिसऱ्या दर्जाच्या खेळाडूंसाठी झेन्टोव्हिककडून पराभव स्वीकारणे काही कमीपणाचे नव्हते.”

‘तिसऱ्या दर्जाचे खेळाडू’ या एका वाक्प्रचाराने मॅकोनोरसारख्या गर्विष्ठ खेळाडूचा स्वाभिमान मी कसा ठेचला, हे आठवून माझे मनोरंजन झाले. पण खर्चिक व्यापार करण्याकडे त्याचा कल असल्याने, मला त्याचा स्वाभिमान ठेचल्याचा काही पश्चात्ताप होत नव्हता. त्यामुळे शेवटी मला माझे कुतूहल शमवता आले. त्या धमकीवजा प्रसंगातील चार पाच खेळाडूंना आम्ही

कळवायला अजिबात वेळ घेतला नाही आणि त्या खेळापूर्वी आम्ही फक्त आमचे टेबलच राखून ठेवले नाही तर आजूबाजूची चार पाच टेबलेही राखून ठेवली, जेणेकरून आसपासच्या लोकांच्या वर्दळीचा व त्यांच्या गडबडीचा त्रास होऊ नये.

ठरलेल्या दिवशी आमचा गट ठरल्या वेळी पूर्ण संख्येने हजर राहिला. जगज्जेत्याच्या समोरची जागा अर्थात मॅकोनोरला दिली गेली. त्याने त्याच्यावरील दडपण एकामागोमाग एक सिगरेट ओढून व सारखे अधीरतेने घड्याळात वेळ बघून कमी केले. पण झेन्टोव्हिकने यायला दहा मिनिटे उशीर केला. [ मला माझ्या मित्राकडून असे होणार असल्याचा सुगावा लागला होता. ] त्यामुळे त्याच्या ठामपणे झालेल्या आगमनाचा परिणाम वाढला. तो शांतपणे टेबलाशी चालत आला. स्वतःची ओळख करून न देता, तो गर्विष्ठपणे बोलला, “मी कोण आहे, हे तुम्हाला माहितीच आहे आणि तुम्ही कोण आहात यात मला काही स्वारस्य नाही. त्याने व्यावसायिक कोरडेपणे तांत्रिक व्यवस्थेवर टीका केली. तो म्हणाला की त्याच वेळी जहाजावर खेळ खेळणे अशक्य होते. त्याने आम्हा सर्वांशी एकदम खेळायचे ठरवले. प्रत्येक खेळीनंतर तो आम्हाला त्रास होऊ नये म्हणून, खोलीच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या टेबलात काही सुधारणा सुचवे. एकदा आम्ही खेळलो

व पेल्यावर चमच्याने आवाज केला. [ दुर्दैवाने आमच्याकडे घंटी नव्हती. ] आम्ही दुसरा काही विचार करण्यापूर्वी त्याने एका खेळीसाठी जास्तीत जास्त दहा मिनिटांची वेळ सुचवली. लक्ष वेधून घेण्यास नाराज अशा शाळेतील मुलांप्रमाणे, आम्ही प्रत्येक गोष्ट कबूल केली.

झेन्टोव्हिकने माघार घेतल्यासारखे दाखवत, ठामपणे पहिली प्रतिक्रिया दिली आणि लगेच त्याने सुचवलेल्या जागी थांबून राहिला. सहजतेने तेथून उठला व एका मासिकात दाखवल्या प्रमाणे पलटी मारली.

या खेळाचे वर्णन करायचे काही कारण नव्हते. तो जसा संपायचा होता तसा, फक्त चोवीस खेळींनंतर, आमच्या पूर्ण पराभवाने संपला. हे मोठे नवल होते की त्या जगज्जेत्याने डाव्या हाताने खेळून अर्धा डझन कच्च्या खेळाडूंवर मात केली. आम्हाला फार उदास करणारे काय असेल तर, ती म्हणजे झेन्टोव्हिकची सहजतेने केलेली आक्रमक चढाई! आम्ही फारच कुचकामी ठरलो. तो प्रत्येक खेळीपूर्वी पटाकडे एखादा घाईचा कटाक्ष टाके व आमच्याकडे आम्ही निर्जीव लाकडी पुतळे असल्यासारख्या बेफिकीरीने बघे. एकाद्या लूत भरलेल्या कुत्र्याला काही तुकडे फेकावेत, त्याप्रमाणे त्याचे चढेल हावभाव

होते. माझ्या मते, थोड्या भावनाशीलपणे तो आमच्या चुका दाखवू शकला असता. किंवा आम्हाला एखाद्या शब्दाने शाबासकी देऊ शकला असता. पण डाव संपला तरी हे हलणारे बुद्धिबळाचे मानवी मशीन 'मात' सोडून एकही शब्द बोलले नाही. आम्ही दुसरा एक खेळ खेळायचे म्हटल्यावर तो पटासमोर निश्चलपणे बसून राहिला. मी आधीच --- वाईट अशा बुद्धिहीन व भावनाशून्य पद्धतीने एखाद्याला वागवल्यावर तो होईल तसा मी लाजीरवाणेपणाने उठून उभा राहिलो होतो --- असे दाखवायचा प्रयत्न करत होतो की या पैशांच्या देवघेवीचे फलित व तातडीचे भावनिक आवाहन असे सुचवत होते, की आपल्या ओळखीचा आता शेवट झाला. निदान माझ्या बाबतीत तरी! पण माझ्या रागामध्ये मी माझ्यापुढे उभ्या असलेल्या मॅकोनोरचा जरासा घोगरा आवाज ऐकला, "ओहो, दुसरा डाव, दुसरा खेळ!"

त्याच्या आवाजातील लागेल अशा मुद्दाम बोलण्याने मी चक्रावून गेलो. खरे तर त्या वेळेस मॅकोनोर नम्र व सभ्य माणसापेक्षा, दुसऱ्याला गुद्दा मारायच्या तयारीत असलेल्या मुष्टीयोद्ध्यासारखा दिसत होता. झेन्टोव्हिकच्या वाईट वागण्याने किंवा त्याच्या स्वतःच्या रोगनिदानशास्त्राच्या जवळ जाणाऱ्या गर्वामुळे! कुठल्या का कारणाने होईना, पण मॅकोनोर पूर्णपणे

बदलला होता. तो आनखशिखांत लाल झाला होता. त्याच्या भावनांच्या शक्तीने नाकपुड्या फुलल्या होत्या. त्याला घाम फुटलेला दिसत होता. त्याच्या प्रकर्षाने बाहेर आलेल्या हनुवटी व आवळून धरलेल्या ओठांच्या मध्ये ठळक रेष पडली होती. थोड्या प्रयत्नांनी मला त्याच्या डोळयातील फडफडणारी बेफाम आस दिसली. फिरत्या चाकावर चेंडूचा नेम साधायचा प्रयत्न करत असलेल्या लोकांना आवर घालायचे त्याचे मुख्य काम चालले होते. सहा सात वेळा फिरवूनही त्याला पाहिजे तो रंग येत नव्हता. दोनदा, चारदा काठ्या घालूनही हवा तो परिणाम साधत नव्हता. मला क्षणार्धात समजले की काठ्या घालूनही हा वेड्यासारखा अभिमानी माणूस, जोपर्यंत तो एकदा तरी जिंकत नाही, तोपर्यंत झेन्टोव्हिकच्या बरोबर खेळत रहाणार. मग भले त्याची आयुष्यभराची कमाई पणाला लागो. जर झेन्टोव्हिक चिकटून राहिला, तर त्याला मॅकोनोरमध्ये सोन्याची खाण सापडली असती. त्यातून तो हजारो --- अगणित डॉलर फावड्याने खणून काढू शकला असता.

झेन्टोव्हिकने निष्क्रिय राहून नम्रपणे म्हटले, “जशी तुझी इच्छा. आता सभ्य माणसानो, तुम्ही काळया सोंगट्या घ्या.”

दुसरा खेळ साधारण पहिल्यासारखाच झाला. फक्त काही उत्सुक प्रेक्षक आम्हाला उत्तेजन देत होते. मॅकोनोर इतक्या टक लावून पटाकडे बघत होता, जसे काही तो सोंगट्यांना त्याच्या तीव्र इच्छेने जिंकण्यासाठी भूल घालत होता. मला माहिती होते की त्याने 'मात' असे ओरडण्यासाठी व विरुद्ध असलेल्या भावनाशून्य प्रतिस्पर्ध्यासाठी आनंदाने हजार डॉलरही खर्च केले असते. सांगायला विचित्र असले, तरी आम्ही सगळे त्याचा काहीसा राग बघत होतो. आम्ही एकमेकांना दाबत, प्रत्येक खेळीची पूर्वीपेक्षा जास्त हरहुन्नरीने चर्चा करत होतो. झेन्टोव्हिकला परत टेबलाकडे यायचा संदेश मिळायच्या शेवटच्या मिनिटापर्यंत आम्ही ते करत होतो. हळूहळू आम्ही सदतिसाव्या खेळीकडे आलो आणि आश्चर्य म्हणजे आमची स्थिती फारच आघाडीची झालेली दिसत होती. कारण आम्ही सोंगट्यांचा ढीग शेवटून दुसऱ्या घरात c २ मध्ये आणण्यात यशस्वी झालो होतो. आता आम्हाला कसली गरज होती, तर नवीन वजीर जिंकण्यासाठी फक्त c १ मध्ये हलण्याची. या सहज खेळीच्या संधीसाठी आम्ही फार भाव खात नव्हतो. आम्ही एकमताने धाकधुकीत होतो, की हा वरवर दिसणारा फायदा झेन्टोव्हिकने लावलेला सापळा असावा. कारण त्याला परिस्थितीची जास्त चांगली जाण होती. पण तणावाच्या

सर्वसाधारण अभ्यासानंतर व चर्चेनंतर आम्ही आमचे उद्दिष्ट गाठण्यातील फसगत ओळखू शकलो नाही. शेवटी आमचा वेळ संपत आला तेव्हा आम्ही धोका घ्यायचे ठरवले. मॅकोनोरचा हात सोंगटीवर होता व तो ती शेवटच्या घरात हलवणार होता, तेव्हा त्याला त्याचा हात एकदम आखडल्यासारखे वाटले आणि कोणीतरी घाईने कुजबुजले, "देवासाठी असे करू नकोस." नकळत आम्ही सगळे वळलो. तो लांब, साधारण पंचेचाळीशीचा, ठळक नाकाडोळयाचा, विचित्र, फिकट पांढऱ्या रंगाचा, डेकवर उभा असलेला मनुष्य होता. त्याने माझे लक्ष वेधून घेतले. गेल्या काही मिनिटात आमचे सगळे लक्ष आमच्या समस्येकडे लागलेले असतांना, काही मिनिटांपूर्वी तो आला असावा. आम्ही त्याच्याकडे टक लावून बघतांना पाहून तो बोलला,

"जर तुम्ही आता त्याचा वजीर घेतलात, तर तो उंटाला बरोबर c १ नेऊन ताबडतोब तुमचा वजीर पळवेल. आणि तुम्ही त्याच्या वजीराबरोबर त्याचा घोडा घ्याल. पण तो त्याचे प्यादे d ७ ला ह्लवून तुमच्या हत्तीला धमकावेल. तुम्ही तुमच्या वजीराचा उपयोग केलात, तरी तुम्ही हराल --- नऊ ते दहा खेळींमध्ये तुमचा खेळ आटपेल."

१९२२ साली, अलेखाईनने बोगोलीजूबोव्हबरोबर पिस्ट्यान ग्रँड टूर्नामेंटमध्ये खेळतांना, याचा प्रयोग केला होता.

चकित होऊन, मॅकोनोरने सोंगटीपासून त्याचा हात मागे घेतला. आणि आमच्याप्रमाणेच तो आश्चर्याने अचानक आमच्या मदतीला आलेल्या स्वर्गातील देवदूतासारख्या माणसाकडे पाहू लागला. अजून नऊ खेळी झाल्यावर चेकमेट होणार असल्याचे ज्याला कळते, तो या खेळात निष्णातच असला पाहिजे. कदाचित जगज्जेतेपदासाठी प्रवास करणारा कुणी असला पाहिजे. अशा अटीतटीच्या वेळी त्याच्या अचानक अवतीर्ण होण्याबद्दल व काही खास वक्तव्याबद्दल अनैसर्गिक असे वाटत होते. पहिल्यांदा मॅकोनोरने त्याचा शहाणपणा आजमावून पाहिला.

तो उद्दीपित होऊन बोलला, "तुमचा काय सल्ला राहील?"

"आताच पुढे जाऊ नका. स्वतःला उघडे न पाडणारी कृती पहिल्यांदा करा. धोक्यातून, g ८ पासून h ७ पर्यंत राजा हलवणे हे जास्त महत्वाचे आहे. मग तो त्याचा हल्ला कदाचित दुसरीकडे वळवेल. पण तुम्ही हत्ती c ८ पासून c ४ ला हलवून, त्याला प्रत्युत्तर देऊ शकता. यामुळे त्याला दोन खेळी व एक प्यादे मिळून फायदा होईल. मग तुमच्या प्याद्याला त्याच्याविरुद्ध जायला वाव मिळेल. आणि तुम्ही जर योग्य रीतीने खेळलात, तर तुम्ही खेळ

अनिर्णीत ठेऊ शकाल. जास्तीत जास्त तुम्ही त्याची आशा ठेऊ शकता.”

परत एकदा आम्ही आश्चर्यचकित झालो. त्याचा योग्य निर्णय व ठोकताळे बांधण्याचा वेग, या दोन्ही गोष्टींबद्दल आम्ही घाबरूनच गेलो. जणू काही आम्ही पुस्तकात छापलेल्या खेळी वाचत होतो. कुठल्याही प्रसंगी त्याचे मध्ये बोलणे आणि जगज्जेत्याविरुद्ध लक्षात न येणाऱ्या संधी सांगणे, याचा जादूसारखा उपयोग झाला. त्याला बुद्धिबळाचा पट नीट दिसावा म्हणून आम्ही बाजूला सरकलो. मॅकोनोरने परत विचारले,

“तर मग राजाला g ८ पासून h ७ पर्यंत हलवायचे?”

“बरोबर! मुख्य म्हणजे त्याला सुखरूप ठेवायचे.”

मॅकोनोरने त्याला सांगितल्याप्रमाणे केले आणि आम्ही पेल्यांवर आवाज केला. झेन्टोव्हिकने त्याच्या नेहमीच्या शांतपणे आमच्या टेबलाकडे थोडे हलून, एक दृष्टीक्षेप टाकून आमची खेळी पाहिली. मग त्याने राजाचे प्यादे h २ पासून h ४ ला हलवले. हे अगदी त्या नवख्या माणसाने सांगितल्याबरहुकुम होते. तो नवखा माणूस आधीच उद्दीपित होऊन कुजबुजत होताः

“हत्तीला c ८ पासून c ४ पर्यंत पुढे काढा. नंतर त्याला त्याचे प्यादे पहिल्यांदा झाकावे लागेल. पण त्याची त्याला काही मदत होणार नाही. तुम्ही तुमचा घोडा d ३ पासून e ५ पर्यंत हलवून, त्याला मारू शकाल. त्याच्या मोकळया प्याद्यांची काही काळजी करायचे कारण नाही. अशा तऱ्हेने तुम्ही आगेकूच कराल. हल्ला करू नका. बचाव करायचे थांबा.”

हे आम्हाला समजले नाही. हे आम्हाला ग्रीक भाषेइतके अगम्य होते. पण मॅकोनोर त्याच्या भूल पडलेल्या अवस्थेत होता. त्याने परत आज्ञा पाळली. झेन्टोव्हिकची खिल्ली उडवण्यासाठी आम्ही परत पेल्यांवर आवाज केला. पहिल्यांदाच त्याला झटपट निर्णय घेता आला नाही. पण त्याने भुवई उंचावून पटाचा अभ्यास केला. मग त्याने त्या परक्या माणसाने आधीच सांगितलेली खेळी खेळली व जाण्यासाठी उठला. पण तो लांब जाण्यापूर्वी, काही नवीन अनपेक्षित असे झाले. आमचा दर्जा आजमावण्यासाठी झेन्टोव्हिकने डोळे उंचावून बघितले. त्याला असा शोध घ्यायचा होता, की कोण अचानक इतक्या जोरकसपणे विरोध करत होते.

त्या क्षणापासून आम्ही कल्पनेपलीकडे उद्दीपित झालो. तोपर्यंत आम्ही गंभीररपणे आशा ठेऊन खेळलो नव्हतो. पण आता झेन्टोव्हिकचा थंडपणा व शिष्टपणा मोडून काढायची

कल्पना आमच्या नसानसांमध्ये फुरफुरू लागली. आमच्या नव्या मित्राने अगोदरच पुढची खेळी दाखवली होती. आम्ही झेन्टोव्हिकला धारेवर धरायला सज्ज झालो होतो --- पेल्यावर चमचा आपटतांना माझी बोटे थरथरत होती. आता आमचा पहिला विजय झाला. तोपर्यंत सर्व स्पर्धा जिंकणारा झेन्टोव्हिक, हो नाही करत शेवटी हळूहळू धपकन खाली बसला. या हालचालीबरोबर आधीचे त्याचे श्रेष्ठत्व व आमच्यामधील असमानता नष्ट झाली. आम्ही त्याला, निदान शारीरिक दृष्ट्या तरी, आमच्या पातळीला आणले. त्याने खूप वेळ विचार केला. त्याचे डोळे खाली पटाकडे लागलेले होते. त्यामुळे त्याच्या पापण्यांच्या सावलीमुळे त्याची बुबुळे दिसत नव्हती. त्याचे तोंड हळूहळू उघडे पडले. त्यामुळे त्याच्या गोल चेहऱ्याला साध्या मनाचे रूप आले. झेन्टोव्हिकने काही मिनिटे मनन केले. मग उठून उभा राहिला. आमचा मित्र आधीच कुजबुजत होताः

"तो जमिनीला खिळल्यासारखा विचार करतो आहे. पण लक्ष देऊ नका. काही झाले तरी त्याला बदलायला लावा. बदलणे भाग पाडा. मग आपण स्पर्धा अनिर्णीत ठेऊ. आता त्याला देवही वाचवू शकत नाही."

जसे सांगितले गेले, तसे मॅकोनोरने केले. पुढच्या काही खेळी म्हणजे दोन विरोधकांची अनाकलनीय देवघेव चालली होती.

[ बाकी आम्ही खूप वेळापासून, फक्त गरजेपेक्षा जास्त कसली तरी इच्छा करत होतो. ] सुमारे सतरा खेळींनंतर झेन्टोव्हिकने खूप वेळाने वर बघून विचारपूर्वक म्हटले, "सामना अनिर्णीत."

क्षणभर तेथे शांतता पसरली. तुम्हाला अचानक लाटांची गुणगुण, रेडिओवरून जाझ संगीत व डेकवर, पॅसेजमध्ये आणि खिडकीच्या तुटक्या भागातून हळूवार नाजूक अशी वाऱ्याची शीळ ऐकू येणे शक्य होते. कुणाच्या श्वासाचा आवाज येत नव्हता. हे एकदम अचानक झाले. या अशक्य घटनेने आम्हा सर्वांना धक्का बसला होता. या परक्या विचित्र माणसाने त्या अर्धवट हरलेल्या खेळात, त्याची इच्छा जगज्जेत्यावर लादली होती.

मॅकोनोर अचानक मागे वाकला आणि त्याने रोखून धरलेला श्वास त्याच्या ओठातून 'आहा' असा आवाज काढत, बाहेर पडला. मग मी झेन्टोव्हिकचे निरीक्षण केले. गेल्या काही खेळींमध्ये मला असे वाटत होते, की तो क्षीण झाला आहे. पण त्याला त्याचा स्वाभिमान राखून ठेवण्यात, काही अडचण नव्हती.

त्याने गप्प रहात व पटावरील सोंगट्या हळूवारपणे ढकलत, बेफिकीरीने फक्त एवढेच विचारलेः

“अजून एक डाव खेळायची तुमची इच्छा आहे का?”

त्याने अगदी पूर्ण व्यावसायिकपणे व उपजीविकेचा उद्योग असल्यासारखा प्रश्न विचारला. पण ही उल्लेखनीय गोष्ट होती, की त्याने मॅकोनोरकडे बघण्याऐवजी, टक लावून आमचा फायदा करून देणाऱ्याकडे त्याचे डोळे वळवले. गेल्या काही खेळींमध्ये एखाद्या घोड्याने खोगीर घालण्याकाढण्यावरून त्याच्यावरील नव्या चांगल्या स्वाराला ओळखावे, तसे त्याने त्याला ओळखले असावे. नकळत आम्ही त्याच्या नजरेचा मागोवा घेत गेलो. त्या परक्या इसमाकडेही आम्ही पहात होतो. पण त्याने काही विचार करून काही बोलण्यापूर्वी, मॅकोनोर उद्दीपित होऊन अभिमानाने विजय साजरा करत जोराने ओरडलाः

“पण आता तुला एकट्याला झेन्टोव्हिकविरुद्ध खेळावे लागेल. फक्त तू आणि झेन्टोव्हिक!”

परंतु आता कधी काही अपेक्षा न केलेले घडले. अजूनही एकटक पटाकडे बघणाऱ्या परक्या इसमाने चमकून आतुरतेने

सगळ्यांची नजर व कान त्याच्याकडे लागलेले पाहिले. तो गोंधळला.

तो ठामपणे सरळ काही लागते नसल्यासारखा म्हणाला ,"सभ्य लोकहो, ते अशक्य आहे. असे करायचा काही प्रश्नच नाही --- तुम्ही माझा विचारदेखील करू नये --- आता मला हा खेळ सोडून वीस, नाही, पंचवीस वर्षे झाली --- आता मी केवळ माझ्या उद्धटपणामुळे तुमच्या खेळात कुणी न विचारता हस्तक्षेप केला. मी माझी मर्यादा ओलांडल्याबद्दल मला क्षमा करा --- मी आता खात्रीपूर्वक तुम्हाला त्रास देणार नाही." आणि आम्ही आश्चर्याच्या धक्क्यातून बाहेर येण्यापूर्वी तो खोलीबाहेर निघून गेला.

त्याच्या बदललेल्या मनस्थितीत टेबलावर मूठ आपटत मॅकोनोर ओरडला,

"पण यावर विश्वास ठेवणे अवघड आहे. बुद्धिबळ खेळल्याला या माणसाला पंचवीस वर्षे झालेली असणे शक्य नाही. तो प्रत्येक खेळी आजमावत होता. प्रत्येक पुढील खेळी पाच सहा खेळींच्या आधीच सांगत होता. डोके चालवल्याशिवाय हे करणे सर्वस्वी अशक्य आहे --- नाही का?"

हा शेवटचा प्रश्न विचारल्यावर मॅकोनोर विचार न करता झेन्टोव्हिककडे वळला. पण तो जगज्जेता अविचल राहिला.

तो त्याच्या व्यावसायिक थाटात, वरवर बेफिकिरी दाखवत, पण खरे तर काळजीपूर्वक म्हणाला, "मी काही बोलू शकत नाही. पण त्या नवख्या माणसाचा खेळ काहीसा रुचीपूर्ण व नवल वाटण्यासारखा होता. म्हणूनच मी त्याला मुद्दाम संधी दिली. जर तो अनामिक माणूस किंवा तुम्ही उद्या अजून एक डाव खेळू इच्छित असाल, तर मी तीन वाजल्यापासून त्यासाठी तयार आहे."

आम्ही गालातल्या गालात हसू लागलो. आम्हाला सगळ्यांना माहिती होते, की आमच्या त्या अनामिकाला झेन्टोव्हिकने मोठ्या उदार मनाने नक्कीच संधी दिली नव्हती आणि हा शेरा म्हणजे स्वतःच्या पराभवाबद्दलची साधी पळवाट होती. असा अस्वस्थ चढेलपणा पाहण्याची ही आमची इच्छा नव्हती. पण आम्हाला ती घाबरून बघावी लागली. आम्ही शांतीप्रिय व फक्त बघी माणसे होतो. पण आम्हाला अचानक रानटी, महत्वाकांक्षी, जंगली व लढायची खुमखुमी असलेल्या पद्धतीने भडकवले गेले. या भर समुद्रातील जहाजावर आमचा हात झेन्टोव्हिककडून जोराने ओढला जाईल व त्यानंतर ते वृत्त

जगभर पसरेल. यात आकर्षित करणारे गूढही होते. आमचा फायदा करून देणाऱ्याचे ऐन वेळी अनपेक्षितपणे जवळजवळ ऐन महत्वाच्या क्षणी येणे. आणि काळजीयुक्त मोर्चेबांधणी आणि उदासीपासून दूर असलेला व्यावसायिकाचा आत्मविश्वास, यातील विरोधाभास! हा परका इसम कोण होता? अजूनपर्यंत उजेडात न आलेला बुद्धिबळपटु होता का? की तो स्वतःची ओळख आमच्यापासून अपरिहार्य कारणाने लपवणारा एक नावाजलेला शिक्षक होता?

आम्ही तावातावाने या मुद्द्यावर अगदी उद्दीपित होऊन चर्चा केली. सर्वात धाडसी गृहीतक, खरे तर आमच्यासाठी धाडसी नव्हतेच. या पाहुण्याचा भित्रेपणा आणि स्वतःची ओळख आश्चर्य कारक उघडपणे जाहीर न करणे, हे न चुकता कलात्मकतेने कोड्यात टाकणारे सोंग होते. पण एका बाबतीत आमचे एकमत झाले. ती अशी, की कुठल्याही कारणास्तव, आम्ही त्याला नुसता बघ्या प्रेक्षक होऊ देणार नाही. काही करून आम्ही आमच्या हितचिंतकाला दुसऱ्या दिवशी झेन्टोव्हिकशी खेळ खेळायला लावला असता. मॅकोनोरने आर्थिक जबाबदारी स्वीकारली. मध्यंतरीच्या काळात आमच्या माणसाकडून आम्हाला असे

समजले की तो पाहुणा ऑस्ट्रीयन आहे. तर त्याला उद्या खेळण्यासाठी आणायची जबाबदारी माझ्यावर पडली.

इतक्या चपळाईने निघून गेलेला माणूस मला सापडला. तो डेकवर होता. तो एका खुर्चीत वाचत बसलेला होता. मी त्याला भेटण्याआधी त्याचा अभ्यास केला. टोकेरी डोके, थोड्याशा श्रमाने उशीवर टेकले होते. तुलनात्मक दृष्ट्या तरुण चेहऱ्याच्या माणसाचा उल्लेखनीय फिकट रंग बघून, मला धक्का बसला. त्याच्या कानशीलांजवळील केस पांढरे झाले होते. का कुणास ठाऊक, पण मला असे वाटले, की हा माणूस अकाली वृद्ध झाला आहे. मी त्याच्याकडे गेल्याबरोबर तो नम्रपणे उठून उभा राहिला व स्वतःची ओळख करून दिली. त्याचे नाव माझ्या चांगलेच परिचयाचे होते. ते एका उच्चकुलीन ऑस्ट्रीयन कुटुंबाचे होते. मला आठवले की या नावाचा एक माणूस हा स्चूबर्टच्या अगदी जवळचा होता आणि कैसरचा खासगी डॉक्टर होता. तो त्याच कुटुंबातील होता. जेव्हा मी डॉक्टर बी ला जगज्जेत्या झेन्टोव्हिक बरोबर खेळायची विनंती केली, तेव्हा तो चांगलाच आश्चर्यात पडला. मला असे समजले, की त्याला झेन्टोव्हिक जगज्जेता असल्याचे माहिती नव्हते. खरे तर अशा सिहासनाधिष्ठीत खेळाडूच्या बरोबरीने खेळून त्याने छान कामगिरी केली होती.

काही कारणाने या माहितीने त्याच्यावर विशेष ठसा उमटवला. कारण त्याने परतपरत मला विचारले, की त्याचा प्रतिस्पर्धी खरेच जगज्जेता होता का. या परिस्थितीमुळे माझे काम सोपे झाले. त्याच्चा भावनिक स्वभाव बघून, जरी त्याचा पराभव झाला तरी आर्थिक जबाबदारी मॅकोनोरने घेतल्याचे त्याच्यापासून लपवावे, असे मी ठरवले. काही वेळ का कू करत, शेवटी डॉक्टर बी ने स्पर्धेकरता तयार असल्याचे सांगितले. पण प्रेक्षकांनी त्याच्याकडून अवास्तव अपेक्षा ठेऊ नये, ही महत्वाची गोष्ट त्याने मला सगळ्यांना सांगायला सांगितली.

गंभीरपणे हसत, तो पुढे म्हणाला, “असे बघ, सर्व नियम पाळून मी बुद्धिबळाचा खेळ खेळू शकेन की नाही, हे प्रामाणिकपणे मला माहिती नाही. कृपया माझ्यावर विश्वास ठेव, हे मी चुकीच्या नम्रतेने सांगत नाही, की मी गेल्या वीस वर्षात हा खेळ खेळलेलो नाही आणि तेव्हाही मी फार कसलेला खेळाडू समजला जात नव्हतो.

हे त्याने इतके सहजपणे सांगितले, की त्याच्या खरेपणावर संशय घेणे शक्य नव्हते. तथापि त्याला बुद्धिबळातील विविघ दादा मंडळींनी वेळोवेळी केलेल्या खेळी आठवत होत्या. नक्की

तो त्या खेळात फारच बुडून गेलेला असणार! विचित्र स्वप्नाळू पद्धतीने डॉक्टर बी परत हसला.

“खूप बुडालेला!” --- देव जाणे तुला असे म्हणायचे आहे का की मी त्या खेळात फारच बुडून गेलो होतो. पण खरोखर हे अगदी विशेष प्रकारे मोठ्या एकमेवाद्वितीय परिस्थितीत घडले. ही फार गुंतागुंतीची गोष्ट आहे. आम्ही ज्या सुंदर काळात रहात होतो, त्याला दुजोरा देणारी अशी गोष्ट समजता येईल. जर तू मला अर्धातास वेळ दिलास तर --- “

तो डेकवरील खुर्चीकडे सरकला. मी आनंदाने त्याच्या आमंत्रणाचा स्वीकार केला. डॉक्टर बी ने त्याचा वाचायचा चष्मा काढून ठेवला व सुरवात केली. आमच्या दोघांव्यतिरिक्त अजून कुणी नव्हते

“तू व्हिएन्नाचा असून तुला माझ्या कुटुंबाचे नाव माहिती आहे, हे ऐकून छान वाटले. पण तुला माझ्या वडिलांनी व नंतर मी चालवलेली कायद्याची संस्था माहिती नसेल. कारण तू वर्तमानपत्रात वाचले असशील की, आम्ही फारशा केसेस घेत नसू व नवीन पक्षकारांना तर टाळतच असू. खरे तर आम्हाला तशी परवानगी नव्हती. मोठ्या राज्यांना आम्ही कायदेशीर सल्ला देत असू, कारण माझे वडील तिथे पूर्वी कारकून होते व त्यांचे

काम त्या राज्यांच्या इस्टेटी सांभाळण्याचेच असे. राजघराण्यातील काही व्यक्तींचे आर्थिक व्यवहार सांभाळण्याचे कामही आम्ही करत असू. [ हे सर्व बोलणे ठीक आहे, असे मी समजतो. ]  कोर्टाशी व चर्चमधील लोकांशी आमचे संबंध होते. माझे काका कैसरचे खासगी डॉक्टर होते. दुसरे काका सिटेनस्टेटेनमध्ये  भिक्षूंचे मुख्य होते. हे दोन मागच्या पिढ्या चालू होते. आम्हाला ते फक्त पुढे चालू ठेवायचे होते. हे काम आमच्याकडे परंपरेने चालत आले होते. ही गुप्त नोकरी होती, असे म्हणायला हरकत नाही. त्यात गुप्त माहिती बाहेर न पसरवण्याबाबत बंधने होती . आम्ही विश्वासू होतो. त्यांच्या काळजी घेण्याच्या स्वभावाने, त्यांच्या पक्षकारांचे भविष्य मंदीच्या काळात व नंतर आलेल्या पडत्या काळातही चांगले टिकून राहिले. नंतर हिटलरने जेव्हा जर्मनी ताब्यात घेतली आणि चर्चची व राज्यांची मालमत्ता लुटायला सुरवात केली, तेव्हा आम्ही बरेचसे व्यवहार व बोलणी केली [ त्यातील काही परदेशात उद्भवलेलीदेखील होती.] त्यामुळे निदान जंगम मालमत्ता तरी वाचवली गेली. लोकांपेक्षा आम्हा दोघांना कोरिया इत्यादी राज्यांच्या व राजघराण्याच्या काही राजकीय गुपितांबद्दल जास्त माहिती होते. पण आमच्या कार्यालयाचे हेच गुपित [ आमच्या कार्यालयाच्या दारावर काही खूणदेखील नव्हती.]

आणि ज्या काळजीपूर्वक आम्ही एकाधिकारशाहीच्या जवळील लोकांशी संबंध टाळले होते व नको त्या चौकशीपासून सुरक्षित अंतर राखले होते. त्या काळात खरे तर ऑस्ट्रीयातील अधिकाऱ्यांपैकी कुणालाच माहिती नव्हते, की चौथ्या मजल्यावरील आमच्या नम्र कार्यालयातून राजकीय कुटुंबाचा खूप महत्वाचा पत्रव्यवहार होत होता.

नाझींनी जगाविरुद्ध त्यांचे सैन्य बांधण्यापूर्वी आजूबाजूच्या देशात धोकादायक व प्रशिक्षित सैन्य जमवायला सुरवात केली होती. गोरगरीब, दुर्लक्षित, अत्याचारित अशा लोकांचे सैन्य! त्यांच्या तुकड्या प्रत्येक कार्यालयात, व्यवसायात पाठवण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर खबरे आणि हेर सुद्धा पाठवण्यात आले.

डॉल्फस आणि स्चूसचींग यांच्या खासगी खोल्यातही हे झाले. त्यांचे लोक आमच्या छुप्या कार्यालयातदेखील येऊन थडकले. मी फार उशीर होईपर्यंत दुर्दैवाने हे जाणू शकलो नाही. मी माझ्या कार्यालयाला बाहेरून एका सामान्य कार्यालयाचे स्वरूप देण्यासाठी चर्चमधील उप- धर्मगुरूच्या ओळखीचा एक निरुपयोगी कारकून बसवला होता. खरे तर आम्ही त्याला कागद फाईलला लावणे व फोन घेणे इत्यादी कामांसाठी, एक निरागस

माणूस म्हणून नोकरी दिली होती. तो पूर्णपणे अनुल्लेखनीय व बिचारा माणूस होता. त्याला पत्रे उघडायची परवानगी नव्हती. मी सर्व महत्वाची पत्रे त्याची प्रत न काढता टंकलिखित करत असे. कुठलीही महत्वाची कागदपत्रे मी घरी नेत असे आणि सर्व गुप्त सभा राजवाड्यात किंवा माझ्या काकांच्या शस्त्रक्रियेच्या खोलीत करत असे. अशी काळजी घेतल्याबद्दल, मी माझे आभार मानत होतो. खबऱ्यांना महत्वाचे काही समजले नाही. त्या कारकुनाच्या अपरोक्ष सर्व रुचीपूर्ण गोष्टी चालत, कारण त्याच्यावर आमचा विश्वास नव्हता. बहुधा माझ्या गैरहजेरीत एका कुरियरने दिलेली ‘राजेसाहेबांची’ काही पत्रे त्या लबाड कारकुंड्याने, निष्काळजीपणे त्याला दिलेल्या सूचना धुडकावून, उघडली --- त्याला कुठल्याही प्रसंगी बर्लिन किंवा म्युनिचकडून अशा आज्ञा मिळाल्या, की मला संशय येणार नाही अशा तऱ्हेने आमच्यावर लक्ष ठेवायचे. जेव्हा मला तुरुंगात टाकण्यात आले, तेव्हा खूप उशीरा गेल्या काही महिन्यातील त्याचा कामातील गलथानपणा मला आठवला. त्यामुळे त्याला अचानक उत्साह येऊन, त्याने परतपरत माझी पत्रे पोस्टात टाकायचा हट्ट धरला होता. त्यामुळे माझ्याकडून झालेल्या चुकीला मी माफ करू शकत नव्हतो. पण शेवटी, हिटलर आणि त्याचा चमू हळूहळू पण लबाडीने, सैन्याच्या व हुशार माणसांच्या मदतीने, सर्व काही शोधून

काढण्यात यशस्वी झाले. नाही का? किती जवळून व प्रेमाने गेस्टापो माझ्यावर सर्व वेळ नजर ठेऊन होता, हे मला स्चूसचींगने त्याचे राज्य स्थापन केल्याची घोषणा केली त्याच संध्याकाळी, अटक झाल्यावर कळले. एक दिवस आधी हिटलर व्हिएन्नामध्ये कूच करत आला होता. रेडिओवर स्चूसचींगचे निरोपाचे भाषण ऐकल्यावर लगेच नशीबाने काही महत्वाचे कागद जाळून टाकण्यात मी यशस्वी झालो. आणि [ शेवटच्या क्षणी त्या लोकांनी माझे दार तोडायच्या आत ] मी उरलेली कागदपत्रे व सर्व महत्वाचे जुने कागद चर्चच्या लोकांच्या रहायच्या ठिकाणी, ऑस्ट्रीयाच्या दोन राजपुत्रांकडे व माझ्या काकांकडे लॉन्ड्रीच्या पिशवीत घालून, लपवून माझ्या विश्वासू घरमालकाबरोबर पाठवून दिले होते.”

डॉक्टर बी सिगरेट पेटवण्यासाठी थांबला. ज्योतीच्या उजेडात मला जाणवले मला त्याच्या ओठांच्या उजव्या कोपऱ्यात उदास सुरकुती आहे. मला आधी सुद्धा याने धक्का बसला होता. मला असे दिसले की दर काही मिनिटांनी हे होत होते. ती हालचाल क्षणार्धात होऊन जाई. पण त्यामुळे संपूर्ण चेहऱ्यावर अस्वस्थता पसरे. “आता तुला बहुतेक असे वाटते आहे, की जिथे ऑस्ट्रीयाशी प्रामाणिक असणाऱ्यांना नेले, त्या

छळछावण्यांबद्दल आता मी तुला सांगणार आहे. अत्याचार, छळ व फार वाईट अनुभवाबद्दल सांगणार आहे. पण तसे काही झाले नाही. मी वेगळ्या गटात होतो. नाझींनी ज्यांच्यावर अनन्वित शारीरिक व मानसिक अत्याचार केले, त्या दुर्दैवी लोकांमध्ये मी नव्हतो. मला दुसऱ्या  लहान गटात ठेवण्यात आले. आमच्याकडून नाझींना पैसा वा महत्वाची माहिती हस्तगत करायची होती. माझ्यासारख्या एका नगण्य माणसामध्ये गेस्टापोला काही रुची नव्हती. तरीही त्यांना हे समजले असावे, की आम्ही आघाडीची माणसे होतो व त्यांच्या शत्रूंचे विश्वासू व जवळचे लोक होतो. त्यामुळे आम्ही त्यांचे हाडाचे शत्रू होतो. आमच्याकडून काही गुन्हेगारी स्वरूपाचे पुरावे मिळवायचा त्यांचा डाव असावा. राजघराण्यातील काही मनाई केलेल्या ठेवींचा व राजघराण्यातील कुटुंबांविरुद्धचा पुरावा आणि ती माणसे जी निःस्वार्थीपणे ऑस्ट्रीयाच्या राजघराण्याच्या बाजूने लढत होती, संशयित --- खरे तर काही चांगल्या कारणाशिवाय नसलेले --- आमच्या हाताखालून गेलेली ती मोठी मालमत्ता --- अजून तरी त्यांच्या हाती न लागलेली! पण माझ्याकडून त्याबद्दल वदवून घेण्यासाठी ते पहिल्या दिवसापासून, त्यांच्या क्रूर पद्धती अवलंबून, जोर करत होते. माझ्या गटातील लोकांचा त्यामुळे फार छळ केला जात नव्हता. तर वेगळी विशेष वागणूक दिली

जात होती. तुला कदाचित आठवत असेल, आपले कुलगुरू आणि वेगळ्या केसच्या संदर्भात, ज्याच्या नातेवाइकांकडून त्याना बरेच पैसे हडप करायची आशा होती, तो बॅरॉन रोथ्सचाईल्ड यांना काही झाले तरी, तुरुंगात टाकले गेले नाही. त्याऐवजी त्यांना वेगळी, बरी वागणूक दिली गेली. त्याना एका हॉटेलमध्ये नेले गेले --- हॉटेल मेट्रोपोल --- तिथेच गेस्टॅपोचे मुख्य कार्यालय होते. तिथे त्यांना प्रत्येकाला वेगळ्या खोल्या दिल्या गेल्या. मी तसा विशेष कुणी नसून मलाही वेगळी खोली दिली गेली.

हॉटेलातील माझी खोली --- ती फारच छान होती, नाही का? माझ्यावर विश्वास ठेव, जरी त्यांनी आमच्यासारख्या उच्चपदस्थांना बऱ्यापैकी गरम खोल्यांमध्ये ठेवले, तरी ते आम्हाला बर्फाच्या खोल्यामध्ये एकत्र ढकलण्यापेक्षा बरे होते --- त्यातल्या त्यात बरी सोय! क्रूर पद्धतीने मारुन, शारीरक छळ करण्यापेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने विशिष्ट परीस्थितीने गरजेचा बनवलेला पुरावा आमच्याकडून हस्तगत करायचा होता. ती खूप सुंदर व नाजूक एकांतवासाची कल्पना होती.

आम्हाला काही न करण्याव्यतिरिक्त त्यांनी काही केले नाही. कारण हे प्रसिद्ध आहे की पृथ्वीवरील माणसाच्या मनावर काही न

करण्याने जास्त दबाव व अस्वस्थता येते. आम्हाला प्रत्येकाला पूर्ण एकांतवासात कोंडून, आमची खोली बाहेरील जगापासून तोडली होती आम्हाला थंडीत ढकलण्यापेक्षा --- आमचे तोंड उघडण्यासाठी हे आमच्यावर अंतर्गत दबाव आणणे होते. प्रथम मला दिलेली खोली जराही गैरसोयीची वाटली नाही. तिथे दार, पलंग, बेसिन, खुर्ची व गज ठोकलेली खिडकी होती. पण दार रात्रंदिवस कुलुपबंद असे. टेबलावर पुस्तके, वर्तमानपत्र, कागद वा पेन्सिलला परवानगी नव्हती. खिडकीसमोर आग रोखणारी भिंत होती. शारीरिक व मानसिक दृष्ट्या पूर्ण रितेपण माझ्या वाट्याला आले होते. त्यांनी माझी प्रत्येक गोष्ट काढून घेतली होती --- घड्याळ नसल्यामुळे मला वेळ कळत नसे. पेन्सिल नसल्याने मी लिहू शकत नसे. चाकू नसल्याने मी माझे मनगट कापून घेऊ शकत नसे. सिगरेटसारखा क्षुल्लक आरामही नाकारण्यात आला होता. एकही शब्द बोलायची किंवा प्रश्नाला उत्तर देण्याची परवानगी नसलेला वॉचमन सोडून मी माणसाचा चेहराही पाहिला नाही, आवाज ऐकला नाही. माझे डोळे, माझे कान, माझी पंचेंद्रीये सकाळपासून रात्रीपर्यंत व रात्रीपासून सकाळपर्यंत काहीही चेतक अजिबात अनुभवत नसत. सर्व वेळ तुमचे तुम्हीच असता. तुमचे शरीर व चार पाच टेबल खुर्चीसारख्या निर्जीव वस्तू! बाहेरील जगाची संपर्क साधणारी

नळी तुटलेल्या काळ्या समुद्रातील पाणबुड्याप्रमाणे तुम्ही जगत असता. आता तो कधीच त्या खोल समुद्रातून बाहेर येणार नसतो. तिथे करायला काही नव्हते. ऐकायला काही नव्हते. सर्व वेळ माझ्याभोवती ‘काही नाही’ भरून राहिले होते. पूर्णपणे बिनवेळाची व बिनमापाची पोकळी! तुमच्या विचारांसकट तुम्ही परतपरत मागेपुढे फिरता. पण विचारही बुडबुड्यासारखे, बिनमहत्वाचे वाटतात. त्याला पाया काही नाही. ते बेसुमारपणे नुसते गरगर फिरत बसतात. त्यांनाही निरर्थक पोकळी सहन होत नाही. तुम्ही सकाळपासून रात्रीपर्यंत कसली तरी वाट बघत रहाता, पण काही घडत नाही. तुम्ही थांबून रहाता, थांबून रहाता, थांबून रहाता, विचार करता, विचार करता, विचार करता. तुमची कानशीले थाडथाड उडत रहातात. काही घडत नाही. तुम्ही एकटे असता. एकटे, एकटे.

असे चौदा दिवस चालले, मी काळाच्या, जगाच्या बाहेर राहिलो. बाहेरील जगात युद्ध सुरु झाले असले, तरी मला ते माहिती नव्हते. दार, टेबल, पलंग, बेसिन, खुर्ची, खिडकी आणि भिंत यापलीकडे माझे जग नव्हते. मी नेहमी त्याच भिंतीच्या त्याच कागदाकडे, त्यातील रेषांच्या नक्षीकडे बघत बसे. माझ्या

मेंदूच्या आतील भागात छिन्नीने कोरल्यासारखी ती नक्षी रुतून बसे, इतका वेळ मी तिच्याकडे टक लाऊन बघत बसे.

शेवटी चौकशी सुरु झाली. दिवस आहे की रात्र हे न समजता, अचानक तुम्हाला बाहेर काढले जाते. कुठे नेत आहेत, ते न समजून, ते तुम्हाला पकडून घेऊन जातात. बऱ्याच पॅसेजमधून खाली जात जात, तिथे तुम्हाला थांबवतात. एका गणवेष  घातलेले अनेक लोक आजूबाजूला उभे असलेल्या एका टेबलासमोर तुम्ही उभे असता. आत काय आहे, हे माहिती नसलेल्या फाईली व कागद टेबलावर पडलेले असतात. मग प्रश्न सुरु होतात --- खरे आणि खोटे, सरळ व बोचणारे, बोगस प्रश्न, वेडेवाकडे प्रश्न --- तुम्ही उत्तर देत असतांना, अनोळखी माणसाची दुष्ट बोटे, त्यात काय आहे ते माहिती नसलेल्या कागदांमधून फिरत रहातात. काही वृतांत लिहित रहातात. माझ्यासाठी या चौकशीतील सर्वात भयंकर भाग असा होता, की मला हे कधीच कळत नसे, की गेस्टापोला माझ्या कार्यालयात काय चालले होते, यापैकी काय माहिती होते आणि त्यांना माझ्याकडून काय हवे होते. मागे सांगितल्याप्रमाणे आयत्या वेळी मी खरा गुन्हा शाबित करणारी कागदपत्रे माझ्या विश्वासू घरमालकाबरोबर माझ्या काकांना पाठवली. पण त्यांना ती

मिळाली का? की नाही? आणि त्या कारकूनाने काय काय दिले? किती पत्रे रोखली गेली? आम्ही काम करत असलेल्या जर्मन एकाधिकारशाहीमधील कायकाय बाबी त्यांना माहिती झाल्या? चर्चमधील दुर्दैवी लोकांकडून त्यांनी काय काय माहिती मिळवली? असे प्रश्नांवर प्रश्न माझ्या मनात येत राहिले. त्या राज्यासाठी मी काय सुरक्षा व्यवस्था ठेवली? मी कुठल्या बँकांच्या संपर्कात होतो, मला मिस्टर अमुक तमुक माहिती होते का, मला पूर्वेकडून वा स्विझर्लंडहून पत्रे आली नाहीत का? त्यांनी आधीच कितपत शोधून काढले आहे, प्रत्येक विधान भयानक जबाबदारीचे झाले. त्याना माहिती नसलेले काही मी दिले, तर मी कुणाला तरी कारण नसतांना चाकूच्या धारेवर धरत असेन. जर मी फार गोष्टी नाकारत राहिलो, तर मी मलाच जखमा करून घेण्यासारखे होते.

पण चौकशीचा भाग फार वाईट नव्हता. माझ्यातील शून्य स्थितीनंतर चौकशीचा भाग काही वाईट नव्हता. पण चौकशीनंतर पुन्हा त्याच खोलीत, त्याच टेबलाशी, त्याच पलंगाशी, त्याच बेसिनशी, त्याच भिंतीच्या कागदाशी, शून्यात जाणे हा भाग वाईट होता. मला पुन्हा एकांतवासात ढकलल्यापासून, मी विचार करत होतो, की मी चलाख असेन, तर काय बोलायला पाहिजे आणि

मी विचार न करता बोललो तर त्यांच्या मनात कसा संशय उत्पन्न करेन. मी बराच वेळ साधक बाधक विचार केला, माझे विचार तपासले, प्रत्येक शब्द सुटा करून मी तो ठीक बोललो असल्याची खात्री केली. त्यांनी विचारलेला प्रत्येक प्रश्नाचा व मी दिलेल्या उत्तराचा मनात आढावा घेतला. त्यांनी काय लिहिले असेल, व काय निष्कर्ष काढला असेल, हे मला कधीच समजणार नसले तरी, मी त्याचा विचार करू लागलो. त्या रिकाम्या खोलीत, एकदा सुरु झाले की ते माझ्या डोक्यात घोळत राहिले. नेहमी ताजे आणि वेगवेगळे! त्यामुळे माझी झोपही उडाली. गेस्टापोच्या प्रश्नांच्या फैरींनंतर माझे स्वतःचे विचार अथकपणे मला छळत. जास्त दुष्टपणे केलेली तपासणी व छळ! कदाचित तपासणी संपली पण छळ कधीच संपला नाही. या एकांतवासातील संथ गतीने होणाऱ्या छळाचे आभार! आणि माझ्याभोवती नेहमीच्या निर्जीव वस्तू सोडून काही नसणे! काही म्हणजे काही नसणे! आता मला कळले, की या हॉटेलमधील खोल्यांची रचना किती भयानकपणे व्यवहार्य होती व मानसिक दृष्ट्या मरणप्राय होती.

छळछावणीत निदान तुम्हाला तुमचे हात रक्ताळेपर्यंत व पाय गोठेपर्यंत गाडीभर दगड वाहून आणावे लागत. इतर दोन डझन

माणसांबरोबर थंडीत व घाण वासात काम करावे लागे. पण तुम्हाला निदान लोकांचे चेहरे दिसत होते, तुम्हाला शेते, गाड्या, झाडे, तारे, काहीतरी निदान दिसत होते. पण माझ्या खोलीत मी काही बघू शकत नसे. वाईट तोचतोचपणा! माझी माझ्या विचारांपासून व मानसिक भरकटलेपणापासून व मरण आणि रोगांसंबंधीच्या भूतकाळातील घटनांच्या उजळणीपासून सुटका नव्हती. त्याना तेच हवे होते. मी माझ्या विचारांचे चर्वण करत बसावे आणि शेवटी निरुपायाने त्यांना सर्व काही सांगावे. पुरावे पेश करावेत. त्याना हव्या असलेल्या माणसांचा ठावाठिकाणा फोडावा. ,

हळूहळू करायला काही नसल्याचा माझ्यावरील दबाव वाढू लागला. धोका लक्षात येऊ लागला. मी मोडून पडण्याच्या टोकावर जाऊन, काही नवे वळण शोधू लागलो. माझ्या मनाला काही उद्योग म्हणून मी काही बनवायचा व काही पाठांतर घोकायचा प्रयत्न केला. लहानपणची बालगीते, प्रार्थना, पुढे शिकलेले होमर, नागरी कायद्याची कलमे. मग मी अंकगणितावर घसरलो --- कुठल्याही आकड्यांची बेरीज व भागाकार करू लागलो --- पण त्या रिकामपणात काहीच माझ्या मनास येईना. मला कशावरच लक्ष केंद्रित करता येईना. तेच तेच विचार

परतपरत मनात येत रहात --- त्यांना काय काय माहिती आहे? ते काल काय म्हणाले? पुढच्या वेळेस मी काय बोलायला पाहिजे?

ही वर्णन न करण्यासारखी स्थिती होती. असे चार महिने चालले. आता चार महिने लिहायला सोपे वाटते, फक्त दोन शब्द, त्याहून अधिक नाही, कमी नाही. हे खरे आहे. शब्द बनवायला काही वेळ लागत नाही. चार महिने! पण वर्णन करणे, मोजणे, चित्र रेखाटणे, स्वतःसाठी नाही, दुसऱ्या कुणासाठी नाही. मोजमापरहित व काळरहीत अवस्था. वेळ कसा तुम्हाला खायला उठतो आणि तुम्हाला कुरतडत रहातो, याचे वर्णन तुम्ही कुणापाशी करू शकत नाही. तुमच्या भोवताली काही नाही. काही नाही. काही नाही. टेबल, पलंग, बेसिन आणि इतर सर्व तेच तेच. नेहमीच शांतता, तोच वॉचमन, तुमच्याकडे न बघता तुमच्याकडे जेवण ढकलणारा. तुम्हाला वेड लागेल असे नेहमी तेच तेच विचार व त्याभोवती फिरणारा तोच तो शून्यपणा. अस्वस्थतेने मी माझे मन मोडून पडण्यापर्यंत व मनाची अवस्था बिकट होईपर्यंत येऊन पोचतो.

प्रश्नफेरीत सुरवातीला मी स्पष्ट बोलत असतो. माझी वाक्ये शांत व योग्य असतात. काय बोलायचे आणि काय नाही, हे मला कळत असते. आता हळूहळू साधी वाक्ये बोलतांना मी पेनाकडे

टक लाऊन बघत बसतो. भारावला जातो. मी काय बोलतो, ते त्या पेनाने कागदावर लिहिले जात असते. माझी शक्ती क्षीण होत जाते. मी मला वाचवण्याचा क्षण जवळ येताना दिसतो. स्वतःला वाचवण्यासाठी मला माहिती असलेले व काही त्या पलिकडीलही सर्व सांगून टाकावे, असे मला वाटते. या शून्यावस्थेतून सुटण्यासाठी, मी जेव्हा बारा लोकांना फसवून त्यांचे गुपित फोडेन, तेव्हा माझी सुटका होईल का? एका संध्याकाळी असे झालेः या कोंडलेल्या अवस्थेत असतांना वॉचमन माझे जेवण आणत असतो, मी त्याच्यावर जोरात ओरडतो, ''मला चौकशी करणाऱ्यांकडे घेऊन चल. मी सगळे काही सांगून टाकतो. कागदपत्रे कुठे आहेत, पैसे कुठे आहेत, मी सर्व काही सांगतो. सर्व काही. सुदैवाने त्याने काही ऐकले नाही. कदाचित त्याला काही ऐकायचे नसेल.

''या अत्यंत गरजेच्या क्षणी, मला वाचवायचे वचन देणारे काही अनपेक्षित घडले. निदान त्या वेळेपुरते तरी. तो जुलैचा शेवट होता. अंधारी, दाटून आलेला पावसाळी दिवस होता. मला हे लख्ख आठवते आहे, कारण पाऊस पॅसेजमधील खिडकीच्या तावदानांना झोडपून काढत होता. चौकशीसाठी मला पुढच्या खोलीत बसवून ठेवले होते. तुम्हाला प्रश्नकर्त्यासमोर

आणण्यापूर्वी नेहमीच थांबायला लावतात. तुम्हाला थांबवून ठेवणे हे त्यांचे अजून एक तंत्र होते. ते आधी तुम्हाला चिरडीला आणतात मध्यरात्री अचानक बाहेर काढून चौकशीसाठी नेतात. जेव्हा तुमचे  मन व इच्छा यांची तयारी होते, तेव्हा ते तुम्हाला थांबवून ठेवतात. कडकपणे व निरर्थक. एक तास. दोन तास. तीन तास. चौकशीपूर्वी, तुम्हाला दमवायला व तुमचे मनोबल खच्ची करायला. या बुधवारी २७ जुलैला त्यांनी माझी फारच रखडपट्टी केली. मी पडायला येईपर्यंत त्यांनी दोन तास मला उभे करून ठेवले. [ अर्थात मला बसायची परवानगी नव्हती. ] एक दिनदर्शिका टांगलेली होती. छापलेले, लिहिलेले काही वाचायची माझी भूक इतकी प्रचंड होती की मी भिंतीवरील '२७ जुलै' या तारखेकडे खूप वेळ निरखून बघत राहिलो. माझा मेंदू जणू ती अक्षरे खात होता. नंतर मला खूप वेळ थांबवले. मी दाराकडे बघत, बघत, बघत बसलो होतो. ते कधी उघडेल व मला काय प्रश्न विचारले जातील, याचा मी विचार करत होतो, जरी मला माहिती होते, की ते मला माझ्या अपेक्षेपेक्षा वेगळेच प्रश्न विचारणार आहेत. मला उभे करून, थांबवून ठेवल्याचे दुःख होतेच, पण त्यापेक्षा निदान मला दुसऱ्या दोन खिडक्यावाल्या खोलीत आणल्याचे सुख जास्त होते. या खोलीत बेसिन, पलंग व खिडकीला भेग नव्हती. दाराचा रंग वेगळा होता. भिंतीजवळ

वेगळी खुर्ची होती. त्याच्या डावीकडे फाईल्स ठेवलेले कपाट होते.

त्यात छळ करणाऱ्यांचे तीन चार ओलसर मिलिट्री कोट हँगरला लटकत होते. त्यामुळे माझ्या अधाशी डोळयांना काही ताजे, काही वेगळे व नवीन बघायला मिळाले. मी उत्सुकतेने कोटांमधील प्रत्येक सुरकुती पाहिली. उदाहरणार्थ, एका ओल्या कोटाच्या कॉलरवरून मला पावसाचा एक थेंब लटकतांना दिसला, तुम्हाला हे विचित्र वाटेल. पण मी अधीरपणे तो थेंब तिथून कधी खाली पडतो किंवा गुरुत्वाकर्षण झुगारून तो तसाच लटकत रहातो, याची वाट बघू लागलो. हो. जसे काही माझे आयुष्य त्यावर अवलंबून आहे, अशा तऱ्हेने मी टक लावून बघत राहिलो. श्वास रोधून बघत राहिलो. शेवटी जेव्हा तो ओघळून पडला, तेव्हा मी कोटाची बटणे मोजू लागलो. एका बाजूला आठ, दुसऱ्या बाजूला आठ व तिसऱ्या बाजूला दहा. कोटाच्या छातीवरील घड्या मी परत मोजल्या. माझ्या खरे बोलणाऱ्या डोळयांनी त्याला स्पर्श केला, कुरवाळले व मिठीदेखील मारली. या सर्व छोट्या, विचित्र गोष्टी मी ज्या लालसेने केल्या त्याचे वर्णन मी करू शकत नाही. अचानक माझी दृष्टी कशावर तरी खिळली. एका कोटाच्या बाजूच्या खिशात मला थोडा फुगवटा

दिसला. या फुगलेल्या खिशात चौकोनी आकाराचे काय आहे, हे बघण्यासाठी, मी जवळ गेलो. एखादे पुस्तक का? माझे गुडघे थरथरू लागले. एक पुस्तक! चार महिने मी माझ्या हातात पुस्तक धरले नव्हते. ज्यात एकामागून एक शब्द, रेषा, परिच्छेद व पाने दिसतील, अशा त्या पुस्तकाच्या नुसत्या विचारात काही मादक, विस्मयकारी होते. ते तुम्ही वाचू शकता, समजून घेऊ शकता, दुसऱ्याचे नवीन वेगळे विचार मनात साठवू शकता. भूल पडल्यासारखा मी त्या लहानशा पुस्तकाच्या लहानशा वक्रतेकडे टक लावून बघितले. ते एका बिंदूवर इतके चमकत होते, की ते आता जणू त्या कोटाच्या खिशातून भोक पाडत आहे असे वाटत होते. शेवटी मला राहवेना. मी विचार न करता जवळ सरकलो. आता मी ते पुस्तक हातात धरु शकेन, या विचारानेच माझी बोटांची टोके थरथरू लागली. ते न जाणवून मी अजून जवळ सरकलो. नशीबाने वॉचमनने माझ्याकडे लक्ष दिले नाही. मला ते संशयातीतपणे काही वेगळेच वाटत होते. पण ते नैसर्गिक वाटले दोन तास उभा असलेला माणूस क्षणभर भिंतीवर वाकू बघत असेल, असे ते वॉचमनला नैसर्गिक वाटले असावे. शेवटी मी कोटाच्या उजव्या बाजूला उभा होतो. मी मागच्या बाजूला हात नेऊन कुणाचे लक्ष जायच्या आत तिथे हात लावला. मला तिथे सरळ काही हाताला लागले. ते सहज वाकू शकेल असे व

थोडासा कुरकुर आवाज करणारे होते --- एक पुस्तक! एखादी गोळी बंदुकीतून सुटावी, तशी माझ्या मनात एक कल्पना चमकली. हे पुस्तक चोरावे. कदाचित ते जमेल. तू ते तुझ्या खोलीत लपवू शकशील आणि मग वाचणे वाचणे वाचणे. शेवटी परत वाचणे!

माझ्या मनात ही कल्पना विषासारखी चमकल्यापासून, माझे कान तापू लागले व हृदय धडकू लागले. माझे हात बर्फासारखे थंडगार पडून चालेनात. पण क्षणभराने कुणाला कळणार नाही व दिसणार नाही अशी काळजी घेऊन, पाठीमागून हात नेऊन मी कॉलर कोटावर दाबली. एक डोळा वॉचमनकडे ठेऊन, खिशाच्या तळातून हळूहळू पुस्तक वर काढले. मग ते पकडून ह्ळूवारपणे काळजीपूर्वक खेचले आणि ते छोटे, फार जाड नसलेले पुस्तक माझ्या हातात आले. आता हे कृत्य मी पार पाडल्यावर, मी प्रथमच घाबरलो. पण आता माघार घेणे नव्हते. तरी मी ते कुठे ठेऊ शकत होतो? मागच्या मागे मी ते माझ्या कंबरेवरील पँट मधून हळूहळू सरकवत ढुंगणाशी आणले, जेणेकरून मिलिट्री पद्धतीने चालतांना, मी पँटच्या शिवणीवर हात ठेऊन ते धरु शकेन.

आता पहिल्या कसोटीची पाळी आली. मी कोटांपासून बाजूला झालो. एक पाऊल, दोन पाऊले, तीन पाऊले. ते जमले. जर मी माझा हात पट्ट्यावर घट्ट दाबून ठेवला, तर पुस्तक धरून चालणे जमत होते.

मग चौकशी सुरु झाली. आता माझी कसरत सुरु झाली कारण मी उत्तर देतांना काय सांगतो आहे यावर लक्ष केंद्रित न करता, कुणाचे लक्ष न जाता पुस्तक सांभाळण्याकडेच जास्त लक्ष देत होतो. नशीबाने यावेळेस प्रश्नोत्तरे फार वेळ चालली नाहीत व मी पुस्तक घेऊन सुखरूप खोलीवर आलो --- सगळे सादयंत वर्णन करून, मी तुला त्रास देणार नाही. पण पॅसेजमधून जातांना ते घसरून माझ्या पायाशी येऊ लागले, तेव्हा मी बराच खोकला काढून वाकलो व परत ते सुरक्षितपणे परत माझ्या पँटमध्ये कोंबले. पण तो काय क्षण होता, जेव्हा मी पुस्तकासकट माझ्या नरकात एकटा शिरलो. तरीही मी एकटा नव्हतो!

आता तुम्हाला असे वाटले असेल, की मी ताबडतोब पुस्तक काढून बघितले व वाचले, तर तसे मुळीच नाही. पहिल्यांदा मला मी केलेले धाडस साजरे करायचे होते. तो आनंद लांबवून त्या पुस्तक चोरण्याच्या हुशार कल्पनेचे कृत्य आठवत राहिलो. मला माझ्या नसांवर झालेला, आश्चर्यकारक रीत्या उमलणारा परिणाम

तपासायचा होता. ते पुस्तक कसले असलेले मला आवडेल, याचाही विचार करायचा होता. बारीक अक्षरात छापलेले, खूप पात्रे असलेले, खूप पाने असलेले, असे ते असावे, म्हणजे मला जास्त वाचायला मिळेल. मग मला बुद्धीचे काम करायचे होते. वरवरचे नाही. सोपे नाही. पण अभ्यासपूर्ण व मनापासून केलेले! कविता आणि खरे तर माझे असे स्वप्न होते की गोथे किंवा होमरच्या कवितांचे ते असावे. पण शेवटी मी माझी उत्सुकता व कुतूहल अजून ताणून धरु शकलो नाही. वॉचमनने अचानक दार उघडले, तर तो आश्चर्यचकित होऊ नये म्हणून, पलंगावर झोपून मी थरथरत पुस्तक पँटमधून बाहेर काढले.

जेव्हा मी पुस्तक पाहिले, तेव्हा माझी पहिली प्रतिक्रिया निराशेची व थोड्या रागाची सुद्धा होती. इतका धोका घेऊन पळवलेले व इतक्या उत्साहाने, सुरक्षितपणे आणलेले पुस्तक बुद्धिबळ खेळणाऱ्यांसाठी होते. दीडशे कसलेल्या खेळांचे वर्णन त्यात होते. जर मी तुरुंगात नसतो, तर मी ते रागारागाने उघड्या खिडकीतून जोराने फेकून दिले असते. याचे मी काय करणार होतो? या भिकार पुस्तकाचे मी काय करणार होतो? बऱ्याचशा शाळेतील मुलांसारखे मी बुद्धिबळ खेळताना मला कंटाळा आलेला होता. पण या चांगल्या रटाळ पुस्तकाचा मला काय

उपयोग होता? दुसरा भिडू नसेल व पट आणि सोंगट्या नसतील तर तुम्ही  बुद्धिबळ कसे खेळणार? खिन्नपणे काही वाचनीय सापडेल या आशेने, मी पाने उलटली. प्रस्तावना, काही सूचना व कसलेल्या काही खेळांच्या चौकोनी आकृत्या व त्याखालील मला न कळणारी काही चिन्हे a२, a३, Nf१, g३ सोडून बाकी काही नव्हते.

हे सर्व मला गणिती कोड्यांसारखे वाटले. ते मला समजत नव्हते. पण हळूहळू मला त्याचा अर्थ उमगू लागला. सोंगट्यांच्या जागा मला समजू लागल्या a, b, c इत्यादी ही पटावरील उभी घरे होती व १, २, ३ ते ८ ही आडवी घरे होती. त्यामुळे या आकृत्या चिन्हांकित असल्या तरी त्याना एक प्रकारची भाषा होती. मला वाटले, कदाचित मी माझ्या खोलीवर बुद्धिबळपट तयार करू शकेन व मग मी तो खेळ खेळू शकेन. ही कल्पना एकदम आभाळातून माझ्यावर कोसळली. माझ्या पलंगावरील चादरीवर मोठेमोठे चौकोन होते. जर तुम्ही ती चादर व्यवस्थित दुमडलीत, तर तुम्ही चौसष्ठ छोटे चौरस बनवू शकत होता. तेव्हा मी पहिली गोष्ट काय केली असेल, तर पहिले पान फाडून, ते पुस्तक दडवून ठेवले. मग मी उरवलेल्या पावाच्या चुऱ्यापासून राजा, राणी व इतर बुद्धिबळाच्या सोंगट्या बनवू लागलो. त्या अर्थातच फार

चांगल्या बनल्या नाहीत. पण अनेक प्रयत्नांनंतर, मी त्या पुस्तकातल्याप्रमाणे बनवू शकलो. पण मी जेव्हा पूर्ण खेळ त्या माझ्या सोंगट्यांनी खेळू लागलो, तेव्हा त्यातील अर्ध्याअधिक धुळीने माखून गेल्या व त्या बाजूला काढून ठेवाव्या लागल्या. अशा रीतीने माझा पहिला प्रयत्न फसला. त्या सुरवातीच्या दिवसात, मी सतत गोंधळून जात होतो. मला तो खेळ सारखा सारखा परत सुरवातीपासून खेळावा लागे. पाच वेळा, दहा वेळा, वीस वेळा असे झाले. पण या जगात कोण इतके रिकामे आहे व कुणाला इतका माझ्याइतका रिकामा वेळ आहे? मी तर शून्यावस्थेचा, काही नसण्याचा गुलाम नाही का? कुणाला इतकी मनापासून इच्छा व धीर आहे? शेवटी सहा दिवसांनी मी यशस्वीपणे खेळ खेळू शकलो. आठ दिवसांनी मला पावाच्या चुऱ्याच्या सोगट्यांचीदेखील गरज भासेना. पुस्तकातील सोगट्यांच्या जागा समजावून घेण्यासाठी मला आता चौकडीच्या चादरीचदेखील गरज उरली नाही. अजून आठ दिवसांनी मी त्या चादरीशिवाय खेळू लागलो --- पुस्तकातील चिन्हे a१, a२, c७,c८ ही पहिल्यांदा आस्तित्वहीन वाटत होती. पण आपोआप ती दृषायमान भासू लागली. माझ्या डोक्यात त्यांच्या त्रिमित प्रतिमा दिसू लागल्या. पुस्तकातील मजकूर माझ्यासमोर पट व सोगट्या नसूनही माझ्या लक्षात येऊ लागला. हा संपूर्ण बदल

होता. गाण्यातील दर्दी माणसाला नुसती लिहिलेली सुरावट समोर ठेवली, की आवाज व त्याची सुरावट ऐकू येते, तसेच हे झाले. अजून चौदा दिवसांनी पुस्तकात दिलेला प्रत्येक खेळ मी मनापासून सहजपणे खेळू लागलो --- तांत्रिक बाबी समजून घेण्यासाठी मी डोळ्यावर पट्टी बांधून खेळू लागलो. निर्लज्ज धीटपणे केलेल्या चोरीमुळे मला काय अशक्य वर मिळवून दिला आहे, हे मला समजू लागले. अचानक मला वेळ चांगल्या प्रकारे घालवायचे साधन मिळाले. काहीसे निरर्थक, काहीसे उद्देशाशिवाय  असे तुम्ही म्हणाल. पण माझी शून्यावस्था त्यामुळे नाहीशी झाली. या दीडशे खेळांमधून मला एक सुंदर शस्त्र माझ्या एकाकीपणाशी व अस्तित्वाशी लढायला मिळाले. ही छानशी गोष्ट अजून उत्फुल्ल बनवण्यासाठी, मी माझ्या दिवसाचे नीट नियोजन करणे सुरु केले. दोन खेळ सकाळी. दोन दुपारी आणि एक झटपट सिंहावलोकन संध्याकाळी. असा माझा दिवस बांधला गेला. नाहीतर मग असातसा, आकारहीन असा जाणारा सगळा दिवस भरगच्च व न दमता कामाचा झाला. बुद्धिबळाचा तो सुंदर गुण होता. एका विशिष्ट लहानशा जगामध्ये बौद्धीक शक्ती एकवटलेल्या राहिल्या. खूप ताण देणाऱ्या मानसिक श्रमांनीसुद्धा मेंदू दमत नसे. उलट त्याचा चपळपणा व जोम वाढत असे. पहिल्यांदा मी यांत्रिकपणे खेळत असे. पण हळूहळू माझी

आनंददायी, सौदर्यपूर्ण, रसग्रहणात्मक समज जागी होत गेली. मी त्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या. चाल करण्यातील व संरक्षणातील जवळचा गंभीर धोका मला कळू लागला. पुढचा विचार करण्याचे तंत्र, खेळींची व प्रतिखेळींची भविष्याच्या दृष्टीने आखणी करणे, हे मला जमू लागले. एखाद्या कवीच्या काव्यातील चार ओळींवरून बिनचूकपणे तो कवी समजावा, तसे मला बुद्धिबळपटुंचे व्यक्तिमत्व व लकबी समजू लागल्या. नुसता वेळ घालवण्यासाठी जे सुरु झाले, ते आनंदमय होऊ लागले. अलेखिन, लास्कर, बोगोल्जुबोव्ह, टार्टाकोव्हर आणि बाकीचे अशा बुद्धिबळपटु लोकांचे आडाखे व हिशेब हे माझ्या एकाकीपणातील सोबती झाले. माझा त्या तुरुंगातील प्रत्येक दिवस अंत नसलेल्या नावीन्याचा ठरला. नियमितपणे केलेला बुद्धिबळाचा अभ्यासाने माझ्या बुद्धीची धार वाढली. माझे मन ताजेतवाने झाले. खरे पहाता, सततच्या या शिस्तीने माझ्या बुद्धीला धार चढली. मी जास्त स्पष्टपणे व सुसूत्रपणे विचार करू लागलो. हे प्रश्नोत्तरांच्या वेळी दिसून येऊ लागले. बुद्धिबळाच्या डावात, मी नकळत धमक्या व फसव्या युक्त्यांविरुद्ध स्वसंरक्षण करू लागलो. तेव्हापासून मी वॉचमनला कमी लेखायचे सोडून दिले. प्रश्नोत्तरांच्या वेळी मला असे आढळून आले की गेस्टापो व त्याची माणसे मला मानाने वागवत आहेत. त्यांनी इतरांना मोडून

पडतांना बघितले. पण माझा अढळ अचल विरोध बघून त्यांना कळेना, की मला इतके शक्तीमान वाटण्याचे काय गुपित आहे.

हा सुखाचा काळ सुमारे अडीच ते तीन महिने चालला. दिवसेंदिवस मी नेमस्तपणे पुस्तकातील दीडशे खेळ खेळत राहिलो. नंतर अचानक हे थांबले. मला आता परत शून्यावस्था जाणवू लागली. मी त्या दीडशेपैकी प्रत्येक खेळ वीस ते तीस वेळा खेळलो. त्यातील नावीन्य निघून गेले. त्यातील आश्चर्य, उद्दीपित होणे, उचंबळून येणे संपले. ज्या खेळातील प्रत्येक खेळी मला तोंडपाठ झाली होती, ते खेळ परतपरत खेळण्यात काय मजा होती? मी खेळायला सुरवात केल्यावर पुढची खेळी आपोआप माझ्या डोक्यात येई. अंदाज करण्याचे कारणच उरत नसे. काही संशय नसे. काही समस्या सोडवायची नसे. आता माझा वेळ चांगला जाण्यासाठी मला वेगळे खेळ असलेल्या दुसऱ्या पुस्तकाची गरज होती. पण असे होणे सर्वस्वी अशक्य असल्याने, आहे तसेच विचित्र वळण चालू ठेवणे भाग होते. आधीच्या खेळांची जागा घेण्यासाठी मला नवीन खेळ बनवणे भाग होते. मला माझ्याशीच खेळणे भाग होते.

या उल्लेखनीय खेळात किती डोके लढवावे लागते, हे तुम्हाला माहिती आहे का, याची मला कल्पना नाही. पण क्षणभर

विचार केलात तर तुमच्या लक्षात येईल, बुद्धिबळात शक्यतांवर अवलंबून न रहाता, शुद्ध तर्कशक्तीचा वापर अतार्कीकतेने करावा लागतो. या खेळाच्या आकर्षणाचे मुख्य सूत्र हे आहे, की पुढची खेळी वेगवेगळ्या प्रकारे द्विधा मनस्थितीत ठरवावी लागते. शहाणणाच्या लढाईत काळ्याला माहिती नसते. पांढऱ्याच्या योजना व स्थिरपणा असा तर्क करायला लावते आणि त्यांना नाराज करते. तर पांढरा तर्क करुन त्याच्यापुढे जायचा प्रयत्न करतो व काळ्यांचे गुप्त बेत फोडतो व त्याना काही मिळवण्या पासून रोखतो. पण आता काळा व पांढरा एकच व्यक्ती असेल, तर ती निरर्थक गोष्ट होईल. यात एकच मन सतत जाणत असते आणि काही गोष्टी जाणत नसते. त्यात पांढऱ्याप्रमाणे ते इच्छा केलेले विसरायची इच्छा करते व काळ्याने आधीच्या क्षणी केलेल्याप्रमाणे करते. अशा तऱ्हेने दुहेरी विचार करण्याचे ठरवणे, हे जाणतेपणाचे विभाजन करणे आहे. मेंदूची काम करण्याची क्षमता चालू ठेवणे व बंद करणे हे एखाद्या मशीनप्रमाणे आपल्या इच्छेने साध्य करणे, स्वतच्या इच्छेविरुद्ध बुद्धिबळ खेळणे हे विरोधभासात्मक रीत्या आपल्या सावलीवर उडी मारण्यासारखे आहे. थोडक्यात, माझ्या दुःखी काळात मी या अशक्यतेचा, असुसंगतीचा महीनोनमहीने विचार केला. ती अतार्किक होतीच. जर मला पूर्णपणे वेड लागण्यापासून किंवा पूर्ण बौद्धिक

दमणूकीपासून स्वतःला वाचवायचे असेल, तर मला दुसरा काही पर्याय नव्हता. भयानक परिस्थिती मला निदान काळ्या मी व पांढऱ्या मी मध्ये विभाजन करण्याचा प्रयत्न करायला सांगत होती. केवळ त्यामुळे मी माझ्याभोवती पसरलेल्या शून्यावस्थेकडून चिरडला गेलो नसतो.

डॉ बी त्याच्या खुर्चीत मागे रेलून बसला व क्षणभर डोळे मिटले. जणू काही तो मोठ्या प्रयत्नांनी नकोशी आठवण दाबून टाकत होता. परत त्याच्या ओठांच्या डाव्या कोपऱ्यात न आवरणारी सुरकुती पडली. मग तो त्याच्या खुर्चीत सरळ होऊन थोडासा उंच झाला.

“मला वाटते आतापर्यंत मी बऱ्यापैकी स्पष्ट सारे काही सांगितले आहे. पण दुर्दैवाने माझी खात्री नाही, की बाकी सगळे मी इतके स्पष्ट सांगू शकेन. कारण या नवीन व्यवसायासाठी इतके मानसिक श्रम करावे लागतात की माझा माझ्यावर ताबा रहात नाही. मी सांगितले की स्वतःच स्वतःशी बुद्धिबळ खेळणे, हे इतके टोकाचे असुसंगत आहे. तथापि जर बुद्धिबळाचा पट तुमच्यासमोर असेल, तर ही असुसंगतता होण्याची संधी कमी असेल. कारण खरा पट असणे, हे काही अंतरावरील एक बाहेरची वस्तु दाखवेल. खरा पट व सोंगट्या तुमच्यासमोर असतील, तर

तुम्ही विचार कमी कराल. तुम्ही प्रत्यक्ष एकदा टेबलाच्या या बाजूने खेळाल व एकदा त्या बाजूने खेळाल. पहिल्यांदा तुम्ही काळ्याचा विचार कराल व नंतर पांढऱ्याचा विचार कराल. पण ही काल्पनिक जगातील स्वतःविरुद्धची लढाई [ किंवा जर तुम्हाला तसे म्हणायचे असेल, तर स्वतःबरोबरची लढाई ] लढतांना, माझ्या मनाच्या डोळ्यांनी मी त्या पटावरील चौसष्ठ चौकोनांची जागा ठळकपणे निश्चित करत असे. फक्त चालू जागाच नव्हे तर दोन्ही खेळाडूंच्या शक्य असलेल्या पुढील खेळींमधील जागाही निश्चित करत असे. आणि मला हेदेखील माहिती असे, की हे सर्व किती असुसंगत वाटते --- दोनतीनदा नव्हे तर सहा वेळा, आठ वेळा, बारा वेळा असे करणे. माझ्यातील काळ्या किंवा पांढऱ्या मी साठी पुढील चार पाच खेळीचा विचार करणे व  कल्पनेच्या असुसंगत राज्यातील मला [ तुम्हाला या वेडेपणात सामील केल्याबद्दल मला माफ करा. ] दोन्ही खेळाडूंसाठी खेळ जसा पुढे जाईल तशी काय परिस्थिती ओढवेल, हे दोन मनांबरोबर बोलून ठरवावे लागे. काळे मन व पांढरे मन. पण माझ्या या काल्पनिक असुसंगत प्रयोगातील सर्वात जास्त धोकादायक बाब कुठली असेल तर ती अशी होती, की त्यात फक्त स्वतःचे विभाजन नव्हते तर हे करतांना अचानक माझा पाया डळमळीत होऊन, मी खोल दरीमध्ये पडत असे.

आधीच्या आठवड्यात मी बुद्धिबळपटुचा खेळ खेळलेला असे. पण तो म्हणजे निव्वळ मी परत खेळलेला तोच खेळ असे. या क्षणी माझ्यासमोर असलेल्या सामानाचा आढावा घेणे असे. आणि ते काव्य शिकून पाठ करण्यापेक्षा किंवा कायद्याची कलमे लक्षात ठेवण्यापेक्षा, कमी ताण देणारे नसे. ती लहानशी, शिस्तशीर क्रिया असे आणि त्यामुळेच तो मानसिक व्यायाम असे. रोज सकाळी व दुपारी मी खेळत असलेले खेळ म्हणजे मी राग न येता माझी मला केलेली शिक्षाच होती. हे माझा नेहमीचा उद्योग असल्यासारखेच झाले होते. आणि जर खेळात मी चूक केली किंवा पुढे कसे जायचे हे विसरलो, तर माझ्याकडे नेहमी पुस्तक होते. ही कृती नकोशी, पण चांगला परिणाम घडवणारी व माझ्या ताणलेल्या नसांना शांत करणारी असे. त्यात मी व्यक्तीशः गुंतलेला नसे. काळ्या किंवा पांढऱ्या सोंगट्या जिंकल्या, तरी मला काही फरक पडत नसे. अलेखाईन किंवा बोगोलज्युबोव्ह हे बुद्धिबळपटु लॉरेलसाठी खेळत होते आणि मी एक व्यक्ती म्हणून माझी बुद्धी व उत्साह पणाला लावून बघत होतो. बदलत्या परिस्थितीतील खेळाचे सौदर्य, एक उत्तम पारखी म्हणून बघत होतो. पण मी माझ्याशी खेळणे सुरु केल्यापासून, मी फारसे डोके न चालवता, स्वतःला आव्हाने देऊ लागलो. माझ्यातील काळा मी व पांढरा मी यांना एकमेकांविरुद्ध उभे ठाकावे लागायचे,

प्रत्येकाला स्वतःची महत्वाकांक्षा बाळगावी लागायची. स्वतःचा अधीरपणा काबूत ठेवावा लागायचा व जिंकण्यासाठी, स्वतःचे महत्व वाढवावे लागायचे. प्रत्येक खेळीमध्ये मी पांढरा असलो, तर काळा आता काय व कसा खेळेल हे जाणून घ्यावे लागायचे. दुसऱ्याने चूक केल्यावर, पहिल्याला आनंद होत असे. चूक करणारा चिडून नाराज होत असे. हे सर्व जाणीवरहीत वाटे. हा एक प्रकारचा कृत्रिम स्किझोफ्रेनिया होता किंवा विभाजित सद्सद विवेकबुद्धी होती. त्यात धोकादायक उद्दीपनाचे मिश्रणही होते. हे सामान्य माणसासाठी, सामान्य परिस्थितीत धारण करणे, अवघड होते. पण मी कैदी असल्याने, मला कुठल्याही प्रकारचे सामान्य आयुष्य घालवायला जुलुमाने बंदी होती. मी एकांतवासात एकाकी, अती छळाचा, अन्यायी असा तुरुंगवास महीनानुमहिने भोगत होतो. खूप काळ मला माझा साचलेला राग काढायला काहीतरी हवे होते. माझ्याकडे मीच काळा व पांढरा बनून जाणीवरहीततेने खेळण्याशिवाय काही पर्याय नव्हता. शून्यावस्थेसाठीचा माझा राग, माझी इच्छा, वेड्यासारखी या खेळात एकत्रित झाली होती. माझ्यातील काही बाहेर यायला तडफडत होते. पण मी फक्त माझ्यातील मी बरोबर लढाई करू शकत होतो. त्यामुळे खेळतांना मी जवळजवळ वेड लागून उद्दीपित होण्याच्या अवस्थेला पोचत असे.

सुरवातीला माझे विचार शांत व सुसंगत होते. मी एका खेळानंतर माझ्या रागापासून दूर जाण्यासाठी विश्रांति घेत असे. पण हळूहळू माझ्या ताणलेल्या नसा, मला थांबून देत नसत. माझ्या काळ्या मी ने एक खेळी खेळली की तावातावाने पांढरा मी पुढे सरसावत असे. एक खेळ संपतो न संपतो तोच, मला पुढच्या खेळाचे आव्हान दिले जात असे. कोणीतरी एकजण जो हरत असे, तो पुन्हा नवीन डाव मांडायला मला भाग पाडे. गेल्या काही दिवसात, या वेड्या लालसेने मला माझ्याविरुद्ध किती डाव खेळायला लावले असतील --- हजार, कदाचित त्याहूनही जास्त. हा हट्ट मी डावलू शकत नव्हतो. सकाळपासून रात्रीपर्यंत मी वजीर, प्यादी, हत्ती व राजाशिवाय, a, b आणि c या पटावरील जागांशिवाय व विशेष अशा खेळींशिवाय कसला विचारच करू शकत नसे. माझ्या सर्व भावना व माझे मीपण त्या बुद्धिबळाच्या पटात बुडून गेले होते. माझा खेळण्यातील आनंद, इच्छेत बदलला होता. हळूहळू ते खेळणे अनिवार्य झाले. मला त्याचा उन्माद चढू लागला. त्याचे रुपांतर रानटी वेडेपणात होऊ लागले. त्यामुळे माझे जागे रहायचे तास वाढले, एवढेच नव्हे तर झोप उडाली. मी फक्त बुद्धिबळाचाच विचार करू शकत असे. त्यातील खेळी, समस्या एवढेच माझ्या डोक्यात असे. कधीकधी मी झोपेतून घामाने डवरून उठत असे व माझ्या लक्षात येई, की मी

झोपेतही खेळत असलो पाहिजे. मी स्वप्ने बघितली तर, ती ते वजीर, हत्ती, घोडे असल्याचीच असत. जेव्हा माझ्यावर प्रश्नांची फैर झाडण्यात येई, तेव्हा मी माझ्या जबाबदारीचा नीट विचार करू शकत नसे व गोंधळल्यासारखी उत्तरे देई. माझ्या अंतिम प्रश्नांच्या वेळी मी नक्कीच काहीही वेडीवाकडी उत्तरे दिली असणार. कारण विचारणारे लोक आश्चर्याने एकमेकांकडे बघत होते. पण अशा तऱ्हेने गोंधळून ते एकमेकांशी चर्चा करत असतांना, मी मात्र माझ्या खोलीत जाऊन खेळण्यासाठी तरसलो होतो. माझा वेडा खेळ. एक, मग दुसरा आणि मग तिसरा --- त्यात खंड पडल्यास मला त्रास होई. जेव्हा वॉचमन खोली साफ करे व जेवण आणे, तेवढा पाऊण तासदेखील मला माझ्या ताप चढलेल्या अधीरपणात असह्य होई. कधीकधी माझे जेवण संध्याकाळपर्यंत तसेच पडून असे. खेळात रंगून जाऊन मी जेवायचे विसरत असे. मला फक्त तहान लागल्याची शुद्ध असे. सारखे खेळून व विचार करून मला असे होत असणार. मी दोन घोटात पाण्याची बाटली संपवत असे आणि वॉचमनला अजून पाणी आणायला सांगत असे. तरीही क्षणभराने माझी जीभ कोरडी पडत असे. शेवटी माझा खेळातील उन्माद इतक्या टोकाला गेला, की --- मी सकाळपासून रात्रीपर्यंत दुसरे काहीही करत नसे. मी एक क्षणभरही रिकामा बसत नसे. मी खेळाचा विचार करतांना

सतत फेऱ्या मारत राही. खेळ जसजसा अधिकाधिक रुचीपूर्ण होत जाई, तसतसा मी जिंकायच्या इर्षेने अधिकाधिक वेगाने फेऱ्या मारू लागे. मी वेड्यासारखा अधीरतेने थरथरू लागे. माझ्यातील अर्ध्या मी ला दुसरा अर्धा मी फार चेंगट वाटे. मी रागाने टीका करू लागे. ‘जोरात जोरात’ ‘चल आटप चल आटप.’ असे मी ओरडू लागे. तुम्हाला हे विचित्र वाटेल परंतु एक मी दुसऱ्या मी ला चिथावत असे. आज मला हे स्पष्टपणे कळते आहे, की ही अशी अवस्था म्हणजे मानसिक उन्मन अवस्थेचे रोगनिदानशास्त्र होते. आजपर्यंतच्या वैद्यकशास्त्रात त्याला नाव मिळालेले असेल. पण मी त्याचे नाव बुद्धिबळ आजारपण, असे ठेवले होते. शेवटी हा वेडेपणा माझ्या शरीरावर व मनावर हल्ला करू लागला. माझे वजन कमी झाले. माझी झोप त्रासदायक झाली. मी जागा झालो, तरी मला माझे डोळे उघडवत नसत. मला कधीकधी इतका अशक्तपणा येई की पाण्याचा पेला तोंडाशी आणेपर्यंत, माझे हात थरथरू लागत पण मी खेळायला सुरवात केली की मला जोम येऊन, हे सर्व कुठल्या कुठे पळून जाई. मी मुठी वळून वरखाली चालत राही. जणू काही लाल धुक्यातून मला माझा वाईट मनस्थितीतील ओरडणारा खर्जातील आवाज ऐकू येई, ‘चेकमेट’ ‘चेकमेट’!

“माझ्या डोक्यात ही घाबरवणारी अवस्था कशी येत असे, हे तुम्हाला सांगणे मला शक्य नाही. मी एवढेच सांगू शकतो, की मी एका सकाळी जागा झालो तेव्हा मी नेहमीसारखा नव्हतो. माझ्यापासून माझे शरीर जणू अलग झाले होते. मी आरामाचा अनुभव करत होतो. असा अनुभव मला अनेक महिन्यात आलेला नव्हता. माझ्या पापण्या इतक्या जडावल्या होत्या, की मला डोळे उघडवत नव्हते. मी जागा होतो पण गुंगीत असल्यासारखा होतो. माझ्या सर्व जाणीवा बोथट झाल्या होत्या. अचानक मला माझ्यामागून आवाज ऐकू येऊ लागले. जिवंत माणसे बोलत होती. माझा आनंद गगनात मावेना. कारण मला असे कडक व कठोर न वाटणारे आवाज ऐकल्याला, जवळपास वर्ष झाले होते.

मी माझ्याशी बोललो, “तू स्वप्न बघतो आहेस. काही झाले तरी डोळे उघडू नकोस. हे स्वप्न असेच चालू राहू दे. नाहीतर खुर्ची, टेबल, बेसिन, भिंतीचा कागद यासकट ती शापित खोली तुला परत दिसेल. तू स्वप्न बघतो आहेस --- ते तसेच चालू ठेव.”

पण उत्सुकतेने माझ्यावर मात केली. हळू व काळजीपूर्वक मी डोळे उघडले. आणि ओहो, मी वेगळ्या खोलीत होतो. माझ्या हॉटलपेक्षा ही खोली मोठी होती. गज नसलेल्या खिडकीमुळे त्या खोलीत खूप उजेड होता. माझ्या खोलीतील बंदिस्त

शेकोटीऐवजी बाहेर वाऱ्याबरोबर झुलणारी झाडे दिसत होती. भिंत पांढरीशुभ्र व गुळगुळीत होती. माझ्या डोक्यावरचे छत उंच व पांढरे होते --- माझा पलंग नवीन व वेगळा होता आणि हे सर्व स्वप्न नव्हते. माझ्यामागे माणसांचे हळूवार आवाजातील कुजबुजणे ऐकू येत होते. मला पायरव आला. मी आपसूकपणे आश्चर्य दाखवले असणार. केसांवर पांढरी टोपी घातलेली परिचारिका बाई तरंगत आली. माझ्यावर आनंदाचा वर्षाव झाला. मी एका वर्षात बाई पाहिली नव्हती. मी त्या गोड भुताकडे निरखून बघत राहिलो. माझे ते बघणे अती आनंदाचे, पण जंगली असावे. कारण ती बाई मला शांत करू लागली, "शांत व्हा. उगी रहा." पण मी फक्त तिचे शब्द ऐकले. कोणीतरी बोलत नव्हते का? प्रश्न विचारणारे व छळणारे सोडून कुणी या पृथ्वीवर होते का? आणि हा काय चमत्कार होता? नरम, उबदार, नाजूक असा तो बाईचा आवाज होता. मी लोभीपणे तिच्या तोंडाकडे बघत राहिलो. एक माणूस दुसऱ्याशी प्रेमाने बोलतो आहे, हे गेल्या वर्षभरात मी अनुभवले नव्हते. ती माझ्याकडे बघून हसली --- हो, ती हसत होती. अजूनही दयाळूपणे हसणारी माणसे जगात होती --- नंतर ठाम सूचना देणारे बोट तिच्या ओठांवर ठेवले गेले व हळूच काढले गेले. पण मी तिच्या इच्छेप्रमाणे करू शकलो नाही. अजून नवलविशेष संपले नव्हते. त्या दयाळू बाईकडे

बघण्यासाठी मी पलंगाच्या कडेला बसलो. पण मी जेव्हा तसे करायचे प्रयत्न करू लागलो, तेव्हा मला ते जमेना. जिथे माझा उजवा हात, बोटे व मनगट असायला हवे होते, तिथे मला वेगळेच एक मोठे, जाडे, पांढरे व प्रकर्षाने भरगच्च बँडेज हाताला लागत होते. प्रथम मी मला काही न समजता, मी त्याकडे बघत राहिलो. हळूहळू मला समजू लागले, की मी कुठे आहे व मला काय झाले आहे. माझा हात जखमी झाला असावा. मी दवाखान्यात होतो.

वयस्क पण मित्रासारखा असलेला डॉक्टर दुपारी आला. त्याला माझे नाव माहिती होते. तो माझ्या काकांच्याबद्दल, कैसरच्या खासगी डॉक्टरबद्दल इतका मान देऊन बोलत होता, की मला तो  नक्की बरे करणार असल्याची खात्री पटली. त्याने मला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले. विशेषतः असा एक प्रश्न विचारला, की मी गणितज्ञ आहे की रसायनशास्त्रज्ञ आहे. मी नाही म्हटले.

तो पुटपुटला, "विचित्रपणे तू तापात असतांना काही बडबडत होतास, जसे की c३, c४. ते काय ते आम्हाला समजत नव्हते."

मी विचारले की मला काय झाले होते. तो विचित्रपणे हसला.

भोवताली काळजीपूर्वक पाहून, तो खालच्या आवाजात म्हणाला, “फार गंभीर काही नाही. नसांचा खूप दाह. हे पूर्णपणे समजण्यासारखे होते. मार्च १३ पासून हे असे चालू आहे, नाही का? अशा पद्धतीने त्याचे काही नवल वाटायला नको.”

मी मान हलवली.

असे होणारा तू काही पहिलाच नाहीस. पण काळजी करू नकोस.”

त्याच्या दिलासा देणाऱ्या पद्धतीने, तो हे माझ्याशी बोलला आणि त्याच्या चेहऱ्यावरील सांत्वनपर भाव पाहून, मला मी योग्य माणसाच्या देखरेखीखाली असल्यासारखे वाटले.

दोन दिवसांनी त्या दयाळू डॉक्टरने मला काय झाले होते, ते मोकळेपणे सांगितले. वॉचमनने मला माझ्या खोलीत मोठ्याने रडताना ऐकले. त्याला पहिल्यांदा वाटले, की मी कुणाबरोबर भांडत आहे. पण तो दार उघडून आल्याबरोबर मी त्याच्यावर तुटून पडलो व त्याच्या अंगावर रानटीपणे ओरडलो --- “अरे मूर्खा, ए भित्र्या, तू तुझी खेळी खेळशील का?” एवढे बोलून मी त्याचा गळा पकडला. आणि शेवटी त्याच्यावर इतका जोरदार हल्ला केला, की तो मदतीसाठी ओरडू लागला. मला डॉक्टरी

तपासणीसाठी नेऊ लागले, तेव्हा मी आक्रमक होऊन, पॅसेज मधील खिडकीतून धावत सुटलो. खिडकीची काच माझ्या हाताला लागून जखम झाली व काच फुटली --- तुम्हाला अजूनही इथे खोल जखमेची खूण दिसेल. मी माझ्या पहील्या काही रात्री दवाखान्यात काढल्या. मला ताप आला होता. पण आता डॉक्टरना माझ्या मेंदूची जाणीव पूर्णपणे ठीक झाल्याचे सांगितले.

डॉक्टर शांतपणे म्हणाले, “खरे तर मी हे वरच्या अधिकाऱ्यांना सांगणार नाही. नाहीतर ते तुला परत तुझ्या खोलीत डांबून ठेवतील. काय करायचे, ते तू माझ्यावर सोड. मी माझ्याकडून जास्तीत जास्त चांगला प्रयत्न करतो.”

या चांगल्या डॉक्टरने माझा छळ करणाऱ्यांना माझ्याबद्दल काय सांगितले मला माहिती नाही. पण त्याला जे हवे होते, ते त्याने मिळवलेः माझी सुटका. बहुधा त्याने माझे मन ठिकाणावर नसल्याचे सांगितले असणार. किंवा गेस्टापोसाठी मी काही काळाने निरुपयोगी ठरलो असेन. कारण हिटलरने आता बोहेमिया काबीज केले होते आणि अशा तऱ्हेने ऑस्ट्रीयाचा पाडाव झाला होता. त्यामुळे मला फक्त एवढ्या कागदावर सही करावी लागली, की मी चौदा दिवसात देश सोडून जाईन. त्या चौदा दिवसात मला

शेकडो गोष्टी पार पाडाव्या लागल्या. जे जगाचे नागरिक आहेत, त्यांनी परदेशी प्रवास करण्यासाठी खालील गोष्टी सादर कराव्या लागतील. मिलीट्रीचे कागद, पोलीस कर, पासपोर्ट, व्हिसा व सुदृढतेचे प्रमाणपत्र. काय झाले याबद्दल विचार करायला, फारसा वेळ नव्हता. मी जेव्हा पूर्वीच्या घटनांबाबत विचार करायचा प्रयत्न केला, तेव्हा माझ्या मनात काही चमकल्यासारखे झाले. मानसिक दृष्ट्या आपल्याला त्रासदायक वा धोकादायक असे काही असते, तेव्हा आपल्याला त्यापासून रोखणाऱ्या अदृष्य शक्ती असतात. आठवडेच्या आठवडे घालवल्यावर, मी परदेशी या जहाजावर येईपर्यंत, माझ्यात इतके धैर्य आले, की माझ्या बाबतीत काय काय झाले ते मी कुणालाही सांगू शकेन.

तेव्हा आता तुला माझे तुझ्या मित्राशी तुसड्यासारखे वा गोंधळून गेल्यासारखे वागणे समजले असेल. मी सहज सिगरेट ओढायच्या जागी फिरत होतो तेव्हा मी तुझ्या मित्रांना बुद्धिबळाच्या पटासमोर बसलेले पाहिले. मी चकित होऊन, त्या जागी खिळला गेलो. तुम्ही खऱ्याखुऱ्या पटावर बुद्धिबळाचा डाव खेळू शकता, हे मी विसरूनच गेलो होतो. दोन प्रत्यक्ष माणसे एकमेकांसमोर बसून हा डाव खेळू शकतात, हे देखील मी विसरलो होतो.

. माझ्यातील दोन मी बरोबर माझ्या बंदीवासाच्या काळात मी जो खेळ अनेक महीने खेळत होतो, तोच खेळ हे लोक खेळत आहेत, हे समजण्यास मला थोडा वेळ लागला.

माझ्या गंभीर बंदीवासाच्या काळात, मी या हस्तिदंती सोंगट्यांची फक्त प्रतीकात्मक हालचाल करत असे. एखादा भविष्यवेत्ता जशा खूप गुंतागुंतीच्या पद्धतींनी कागदावर काही गणित मांडून आकाशातील ताऱ्याचे प्रत्यक्ष स्थान बघतो व नंतर त्याला आकाशात तो खराखुरा तारा दिसतो, तसेच नवल म्हणजे या प्रत्यक्ष सोंगट्यांची पटावरील हालचाल ही मी माझ्या मनाने तर्क केलेल्या सोंगट्यांच्या हालचालीसारखीच होत होती. मी लोहचुंबकाने खेचला गेल्यासारखा बुद्धिबळाच्या पटाकडे व लाकडात कोरलेल्या खऱ्या राजा, वजीर, हत्ती, घोडे, प्यादी यांच्याकडे बघत होतो. मला या खेळाची प्रत्यक्ष अवस्था समजण्यापूर्वी, मला माझे आभासी जग इथे आणावे लागले. दोन खेळाडूंमधील खरा खेळ बघतांना, माझे औत्सुक्य वाढत चालले. आणि मग तो लाजीरवाणा क्षण आला, जेव्हा मी भान विसरून तुमच्या खेळात हस्तक्षेप करू लागलो. तुमच्या मित्राची हरण्याकडे जाणारी वाईट खेळी बघून, मी रागावलो. जेव्हा मी त्याला थांबवले, तेव्हा मी माझ्या सहजप्रवृत्तीने वागत होतो.  जसे

एखाद्या मुलाला धोकादायक पद्धतीने वाकताना बघून आपण त्याला मागे खेचतो, तसे विचार न करता आपोआप माझ्याकडून वागले जात होते. माझा उद्दामपणा नंतर माझ्या लक्षात आला.”

मी डॉ बी यांना असे सांगून आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला, की ही त्याच्याशी ओळख करून घेण्याची अभूतपूर्व संधी आहे. आणि माझ्या बाबतीत तर त्याने मला सगळे सांगितल्यामुळे, ती दुप्पट आनंदाची झाली आहे. दुसऱ्या दिवशीचा सुधारीत खेळ नक्कीच रुचीपूर्ण झाला असता. तेव्हा डॉ बी सहजतेने खेळायला तयार झाला.

“खरे तर तसे नाही. माझ्याकडून फार अपेक्षा ठेऊ नका. ही माझी एक प्रकारे परीक्षाच असेल --- असे बघण्याची परीक्षा, की मी सामान्य बुद्धिबळाचा डाव, खऱ्याखुऱ्या पटावर, खऱ्याखुऱ्या सोंगट्यांनी व खऱ्याखुऱ्या भिडूबरोबर खेळू शकतो की नाही. कारण मला आता संशय येऊ लागला आहे की मी जे शेकडो, कदाचित हजारो खेळ खेळलो हे खरे बुद्धिबळाचे डाव होते की केवळ स्वप्नातील होते. मला बुद्धिबळाचा भ्रम झाला होता का? मनाची ती स्वप्नासारखी बिघडलेली अवस्था होती का?

मी जगज्जेत्याला आव्हान देऊ शकेन, असा विचार तुम्ही मंडळींनी गंभीरपणे करू नका. माझा तो तुरुंगातील नुसता वेडेपणा

होता, की मी वेडेपणाच्या काठावर उभा होतो, याची चिरफाड करण्यासाठी मला वाटते, मला फक्त हा खेळ खेळण्याची आवड व आकर्षण होते. बाकी काही नाही.''

नंतर जहाजाच्या एका बाजूला धातूच्या डिस्कचा मोठा आवाज झाला. ती जेवण तयार असल्याची खूण होती. म्हणजे आम्ही दोन तास बोलत होतो. डॉ बी यांने माझ्या अपेक्षेपेक्षा फार खोलात जाऊन त्याची हकीगत सांगितली. मी त्याचे आभार मानून निघालो. पण डेकवर फिरण्यापूर्वी तो माझ्याकडे चालत आला व ते सरळसरळ उदास दिसत होता. थोडा थरथरतदेखील होता. तो म्हणाला,

''अजून एक गोष्ट --- तुम्ही त्या जगज्जेत्याला आधीच हे सांगाल का जेणेकरून मी त्याला उद्धट वाटणार नाही. मी एकच खेळ खेळेन --- फक्त जुन्या आठवणी जागवण्यासाठी! नवीन सुरवात नव्हे, तर जणू गाण्यातील भैरवी! मला पुन्हा त्या पाशवी बुद्धिबळाच्या मोहात अडकायचे नाही. मला त्याची आठवण भीतीदायक आहे --- आणि तसेही --- तसेही डॉकटरांनी मला स्पष्ट ताकीद दिलेली आहे. विशेष करून ताकीद दिलेली आहे. ज्याला एखाद्या गोष्टीचे वेड लागते, विशेषतः बुद्धिबळाचे वेड --- तर ते कधीच जात नाही. त्यामुळे बुद्धिबळाच्या पटाच्या जवळ न

गेलेले बरे --- म्हणजे तुला कळते आहे का --- हा खेळ फक्त एकदा मी मला अजमावण्यासाठी खेळून बघतो. परत खेळणे नाही.”

दुसऱ्या दिवशी आम्ही सिगरेट ओढायच्या जागी ठरलेल्या वेळी, दुपारी तीन वाजता जमलो. या राजेशाही खेळाच्या अजून दोन प्रेमिकांना आमच्या गटाने सामावून घेतले. खेळ बघण्यासाठी जहाजावरील कामामधून रजा घेतलेले ते दोन ऑफिसर होते. झेन्टोव्हिकनेही आम्हाला वाट बघायला लावली नाही. त्याला आदल्या दिवशी व दुसऱ्या दिवशी रंगाची कायदेशीर निवड करायची संधी होती. या खेळाचे वेड लागलेला डॉ बी व प्रसिद्ध खेळाडू झेन्टोव्हिक यांच्यातील संस्मरणीय स्पर्धेची सुरवात झाली. बिथोविनच्या अनौपचारिक मैफिलीला कुणी सोमेगोमे यावे, तसे मला खेद आहे, की ती बघायला वर्षानुवर्षे स्पर्धा बघणारे प्रेक्षक नसून फारच कच्चे प्रेक्षक होते.

येणाऱ्या पुढील दुपारी आम्ही एकत्र जमून, खेळ स्मृतीत साठवून ठेवायचा प्रयत्न केला. पण त्यात यश आले नाही. बहुधा आम्ही खेळ पुढे नेण्यासाठी, दोन्ही खेळाडूंवर फार दडपण आणले. दोन्ही खेळाडूंच्या बौद्धीक स्तरातील फरकामुळे खेळातील प्रत्यक्ष फरक पुढे फारच वाढत चालला.

झेन्टोव्हिकसारखा निष्णात खेळाडू त्याच्या शरीराच्या प्रत्येक भागावर ताण देत सतत पटाकडे रोखून बघत राहिला. तर डॉ बी फारच मोकळेपणे व नैसर्गिक रीत्या खेळत होता. शाब्दिक दृष्ट्या उत्तम जाण असलेला व  या खेळात आवड निर्माण केलेला, असा तो खेळात खराखुरा रस घेत होता. तो शारीरिक दृष्ट्या आरामशीर होता. मधल्या रिकाम्या वेळात तो आमच्याशी गप्पा मारत होता. मध्येच सिगरेट पेटवत होता. जेव्हा त्याची खेळी असेल, तेव्हाच तो पटाकडे नजर टाकत होता. प्रत्येक वेळी त्याच्या भिडूची खेळी त्याला अपेक्षित अशीच होत होती.

सुरवातीचा खेळ झटपट झाला. सातव्या किंवा आठव्या खेळीपर्यंत विशिष्ट डावपेच लढवले गेले नाहीत. झेन्टोव्हिकचे विचार करत थांबणे वाढत चालले होते. आम्हाला जाणवले, की आता खरी लढत सुरु झाली आहे. पण प्रामाणिकपणे सांगायचे झाले, तर आमच्यासारख्या अडाणी प्रेक्षकांसाठी खेळात हळू होत जाणारी वाढ ही आमची थेट निराशा करणारी होती. जसजसा सोंगट्यांचा गठ्ठा विचित्रपणे जमत जात होता, तसतशी प्रत्यक्ष खेळाची मजा आम्हाला समजेनाशी झाली होती. आम्हाला दोघा खेळाडूंचे मनसुबे समजेनासे झाले होते. त्यामुळे कोण आघाडीवर आहे, हेदेखील कळत नव्हते. शत्रूच्या खासगी

प्रांतात शिरल्यासारख्या सोंगट्या हलवल्या जात होत्या. पण हे दोन्ही खेळाडू पुढील अनेक खेळींचा विचार करून, सोंगट्या हलवत होते. आम्हाला त्यांचे एकमेकांना शह द्यायचे आडाखे लक्षात येत नव्हते.

आम्हाला खेळ न कळणे, आम्हाला हळूहळू कंटाळा आणून दमवत होता. विशेषतः झेन्टोव्हिकचे विचार करत थांबणे, आम्हा मित्रांना चिरडीस आणत होते. मी अस्वस्थपणे खेळ बघत होतो. तो अधिकाधिक अस्वस्थपणे हातापायांच्या हालचाली करू लागला. आता एकापाठोपाठ एक अशा सिगरेटी ओढू लागला. मग हातात पेन्सिल धरून काही लिहू लागला. मग त्याने अजून पाण्याची मागणी केली. तो पाण्याचे पेल्यामागून पेले रिचवत राहिला. डॉ बी झेन्टोव्हिकपेक्षा शंभरपटीने जास्त लवकर त्याच्या सोंगट्या हलवत होता. काळजीपूर्वक लांबलचक रीत्या केलेल्या विचारानंतर झेन्टोव्हिक जड हाताने त्याची सोंगटी हलवे. तर आमचा मित्र खूप वेळ वाट बघून शेवटी एकदाचे झाले, अशा आविर्भावात नुसता हसे. आणि लगेच त्याची खेळी खेळे. त्याच्या डोक्यात त्याच्या भिडूच्या सोंगट्या सरकवण्याची नोंद आधीच झालेली असे. झेन्टोव्हिक जितका त्याचा निर्णय लांबवे, तेवढी आमच्या मित्राची अधीरता वाढे व त्याचे ओठ रागाचे व

विरोध करायचे  हावभाव दाबून ठेवत. पण झेन्टोव्हिकला तो घाई करत नसे. तो सावकाशीने जास्त जास्त वेळ शांत रहात असे. चिकाटी सोडत नसे. पट रिकामा होत राही. बेचाळीसाव्या खेळीच्या वेळी पावणे तीन तासांनंतर आम्ही सगळे कंटाळून टेबलाभोवती स्वस्थ बसलो. जहाजाचा एक कप्तान आधीच निघून गेला होता. दुसरा काहीतरी हालचाल झाली, तरच पुस्तकातून डोके वर काढत होता. पण नंतर झेन्टोव्हिक काही खेळायच्या तयारीत असतांना, काही अनपेक्षित असे झाले. जेव्हा डॉ बी ने झेन्टोव्हिकला त्याचा वजीर हलवायच्या तयारीत असलेले पाहिले, तेव्हा त्याने झडप घालणाऱ्या मांजरासारखा पवित्रा घेतला. त्याचे पूर्ण शरीर थरथरू लागले. झेन्टोव्हिकने त्याचा वजीर हलवल्याबरोबर त्याने घाईघाईने त्याचा वजीर पुढे काढला आणि विजयोन्मादाने जोरात ओरडला, “तर, डाव संपलेला आहे!” डॉ बी मागे झाला. त्याचे हात छातीवर दुमडले आणि आव्हान देत झेन्टोव्हिककडे बघू लागला. त्याचे डोळे अंगार ओकत होते. इतक्या विजयाच्या आरोळीने केलेली ही खेळी बघण्यासाठी, आम्हाला पटावर वाकण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पहिल्या दृष्टीक्षेपात सरळ सरळ धमकी काही दिसत नव्हती. आमचा मित्र पुढे होणाऱ्या खेळीबद्दल तसा ओरडला असावा. पण आम्हा अडाणी लोकांना, ते समजणे अवघड होते.

झेन्टोव्हिक हा एकटाच असा होता जो या आरोळीनंतर अचल चेहरा ठेऊन धीटपणे विरोध करू लागला. तो तिथे शांतपणे बसला, जसे काही त्याने, “तर, डाव संपलेला आहे!” हे अपमानकारक शब्द ऐकलेच नाहीत. काहीच झाले नाही. आम्ही सगळे श्वास रोधून बसलो होतो. आणि अचानक तुम्हाला टेबलावरील घड्याळाची टिकटिक ऐकू येते. ती खेळाडूंना वेळ समजण्यासाठी असते. तीन मिनिटे होतात. सात मिनिटे, आठ मिनिटे --- झेन्टोव्हिक अचल असतो. पण आतल्या ताणांनी त्याच्या मोठ्या नाकपुड्या फुगून थरथरत असल्याचे मला दिसते. हे शांतपणे थांबणे माझ्या मित्राला व आम्हालाही असह्य होते. तो अचानक पुढे उडी मारतो व परत सिगरेट ओढायच्या खोलीत सुरवातीला हळू व नंतर खूप जोराने पुढे मागे सरकतो. आम्ही सगळे त्याच्याकडे आश्चर्याने बघतो. पण माझ्याइतके अस्वस्थ असलेले कुणी दिसत नाही. कारण त्याचा वेग कमी जास्त असला तरी, त्याच्या उड्यांमधील अंतर तेवढेच असते. रिकाम्या खोलीत तो दर वेळेस अदृष्य अडथळा ओलांडत असल्यासारखे वाटते. मला एका शहाऱ्याबरोबर जाणवते, की त्याचे हे कृत्य नकळत त्याच्या बंदीवासातील वेगाचा मागोवा घेत असते. त्याच्या तुरुंगवासाच्या काळात, तो पिंजऱ्यात कोंडलेल्या जनावरासारखे, असेच करत असणार. त्याचे खांदे आतासारखेच

पोक आलेले व हात घट्ट मुठी वळलेले असणार. तो अशा पद्धतीने --- असाच वरखाली चालत असणार. त्याच्या भकास व ताप आलेल्या डोळ्यात, हजार वेळा वेडेपणाची लालसर झाक दिसते.

पण त्याची मानसिक शक्ती अजूनही जशीच्या तशी असते. कारण तो मधून मधून टेबलाकडे नजर टाकून, झेन्टोव्हिकने अजून निर्णय घेतला की नाही, हे बघत असतो. नऊ मिनिटे, दहा मिनिटे जातात. मग शेवटी आम्हाला अनपेक्षित असे काही घडते. झेन्टोव्हिक टेबलावर स्थिर ठेवलेला त्याचा जड हात हळू उचलतो. तो पुढे काय करतो, याची आम्हाला सर्वांना उत्सुकता असते. पण काही खेळण्याऐवजी तो ठामपणे त्याच्या हाताच्या मागील बाजूने डाव उधळून लावतो. आम्हाला क्षणभर काही कळतच नाही. झेन्टोव्हिक खेळाचा नाद सोडतो. विरोध करायचे सोडतो. जेणेकरून आम्ही त्याला हरलेले पाहू नये. अशक्यपणे अनेक सामने जिंकलेला, जगज्जेता एका माहिती नसलेल्या व पंचवीस वर्षात बुद्धिबळ न खेळलेल्या माणसाकडून पराभव स्वीकारतो. आमचा मिस्टर 'कुणी नाही' असलेला गुप्त मित्र स्पर्धेत उत्तम बुद्धिबळपटुला हरवतो.

जल्लोष करत आम्ही एकेकजण नकळत उठून उभे रहातो. आमचा आनंद व नवल साजरा करण्यासाठी काहीतरी करायला हवे, असे आम्हाला सर्वांना वाटत असते. फक्त झेन्टोव्हिक शांत आणि स्तब्ध असतो. तो दगडी नजरेने आमच्या मित्राला न्याहाळत असतो. थोडा वेळ थांबून तो त्याचे डोके उचलून म्हणतो,

"अजून एक डाव?"

डॉ बी ने एकच खेळ खेळायचे ठरवलेले असते, याची त्याला आठवण करण्यापूर्वीच, माझा विश्वास न बसणाऱ्या उत्साहाने डॉ बी उत्तरतो, "अर्थात." तो लगेच खाली बसून सोंगट्या घाईघाईने पटावर मांडू लागतो. त्यावेळी त्याच्या हालचाली विचित्र वाटत असतात. त्यामुळे त्याच्या थरथरणाऱ्या हातातून दोनदा सोंगट्या खाली जमिनीवर पडतात.

त्याच्या उद्दीपित होण्याच्या अनैसर्गिक अवस्थेमुळे मला काळजी वाटू लागली. आधी फार शांत व्यक्तिमत्व असलेल्या या माणसाला खूप आनंद झाला होता. त्यांच्या ओठाच्या कडेला असलेली सुरकुती अजून ठळक होत होती. शरीर ताप चढल्यासारखे कंप पावत होते.

मी त्यांच्या कानात कुजबुजलो, “नाही. आता नाही. एका दिवसाकरता एवढे पुरेसे आहे. नाहीतर तुला फार ताण पडेल.”

तो वाईट रीत्या हसून बोलला, “ताण! हाः! हाः! नुसते बसण्यापेक्षा मी आता सतरा डाव खेळू शकतो. या वेगाने खेळण्याचा त्रास एवढाच आहे, की मला जागे रहावे लागते. मग आता? सुरु कर. का नाही करत?“

तो झेन्टोव्हिकशी शेवटचे बोलला, तो त्याचा स्वर भीतीदायक होता. खूपच घोगरा होता. झेन्टोव्हिक त्याच्याकडे शांत व संथपणे पहात होता. पण त्याच्या दगडी एकटक नजरेतून एक बंद मूठ दृगोचर होत होती. अचानक त्या दोघांमध्ये काही नवीन घडले. एक धोकादायक ताण व भावनिक आकस निर्माण झाला.

ते खेळातील त्यांच्या क्षमता आजमावून पहाणारे, विरुद्ध असणारे भिडू राहिले नाहीत तर एकमेकांचे आस्तित्व मिटवू बघणारे शत्रू झाले.

झेन्टोव्हिकने पहिली खेळी खेळण्यापूर्वी खूप उशीर केला. मला हे मुद्दाम केले जात असल्याचे समजले. त्या अनुभवी क्लुप्त्या करणाऱ्याने असे शोधून काढले होते, की हळू

खेळल्यामुळे, तो त्याच्या भिडूला चिरडीला आणू शकतो. अशा तऱ्हेने सुरवातीलाच त्याने राजाजवळील प्याद्याला दोन घरे पुढे आणून, अती सामान्य व साधी खेळी खेळली. आमच्या मित्रानेही राजाजवळील प्यादे दोन घराने हलवले. परत झेन्टोव्हिक सहन होणार नाही अशा रीतीने, बराच वेळ थांबून राहिला. ते वीज चमकण्याआधीच्या अवस्थेसारखे होते. तुमचे हृदय धडधडू लागते. तुम्ही थांबता. थांबता. पण गडगडाट होऊन वीज चमकतच नाही.

तो मुद्दाम, दुष्टपणे खूप वेळ काढत असल्याचे माझ्या लक्षात आले. मध्यंतरीच्या काळात, डॉ बी याने तिसरा पाण्याचा पेला संपवला.

मला त्याने तुरुंगात असतांना त्याच्या तापातील अत्यंत तहान लागल्याचे सांगितलेली मागील आठवण आल्याशिवाय रहावेना. त्याची काहीतरी वेगळ्या प्रकारची उन्मन अवस्था होऊ लागल्याची लक्षणे, स्पष्टपणे दिसू लागली होती. मला त्याच्या भुवया घामाने डवरलेल्या दिसल्या. त्याच्या हातावरील खोक लालसर होऊन पूर्वीपेक्षा जास्त ठळक दिसू लागली. पण अजून

चौथ्या खेळीपर्यंत त्याचा स्वतःवरचा ताबा सुटला नव्हता. आता परत झेन्टोव्हिक अनंत काळ विचार करत थांबून राहिला होता. त्यामुळे डॉ बी चा स्वतःवरील ताबा सुटून तो ओरडला,

“चल आटप. तुझी खेळी खेळ.”

झेन्टोव्हिकने शांतपणे वर पाहिले. “मला माहिती आहे, त्याप्रमाणे प्रत्येक खेळीसाठी दहा मिनिटांचा वेळ देण्यात आलेला आहे. ते तत्व पाळून, मी त्यापेक्षा कमी वेळात माझी सोंगटी हलवणार नाही.”

डॉ बी याने त्याचे ओठ थोडेसे हलवले. टेबलाखालील त्याच्या पायाने जास्त जास्त जोराने ठेका धरल्याचे मी पाहिले. रागाने छळ झाल्यासारखे मला नक्की असे वाटत होते की काहीतरी नको ते होणार आहे. त्यामुळे मी जास्त जास्त उदास होऊ लागलो. आठव्या खेळीच्या वेळी एक घटना घडली. डॉ बी याची स्वतःवरील ताबा सुटायची वेळ जवळजवळ येत चालली होती. त्याला त्याचा शांतपणा राखणे कठीण होऊ लागले. तो हातापायाच्या अस्वस्थ हालचाली करू लागला व त्याच्या बोटांनी नकळत टेबलावर तबल्याचा ठेका धरु लागला.

परत एकदा झेन्टोव्हिकने त्याचे शेतकऱ्याचे जड डोके उचलले.

“तू ठेका धरु नकोस, असे मी तुला सांगू शकतो का? त्याने माझे लक्ष विचलित होते. तू ते करत राहिलास, तर मी खेळू शकणार नाही.”

डॉ बी हसून म्हणाला, “नीट समजले.”

झेन्टोव्हिकचे कपाळ चमकले. त्याने रागाने व कडकपणे विचारले, “याचा अर्थ काय?”

डॉ बी फार वाईट हसू हसला. “काही नाही. एवढेच की तू नक्कीच उदास झाला आहेस.”

झेन्टोव्हिकने काही न बोलता डोके खाली घातले. पुढची खेळी खेळायला त्याला सात मिनिटे लागली. अशा संथ गतीने खेळ चालू राहिला. झेन्टोव्हिक जास्त जास्त दगडी पुतळ्यासारखा होऊ लागला. तो प्रत्येक खेळीसाठी जास्तीत जास्त वेळ घेत होता.

झेन्टोव्हिकच्या एका खेळीपासून दुसऱ्या खेळीपर्यंत माझ्या मित्राचे वर्तन विचित्र होत चालले होते. तो खेळामध्ये भाग घेईनासा झाला. त्याचे दुसरेच काही चालू होते. त्याने त्याचा

उद्दीपित वेग सोडून दिला व खुर्चीत स्वस्थ बसून राहिला. विचित्र हावभावांनी शून्यात बघत बसला. तो स्वतःशी सतत काही न कळणारे शब्द गुणगुणत राहिला. एकतर तो काय खेळी करायची या काही लांबलचक आकडेमोडीत गुंग होता किंवा [ हे मला जास्त शक्य वाटते. ] तो सर्वस्वी वेगळे खेळ खेळत होता. शेवटी एकदाची झेन्टोव्हिक खेळी खेळे, तेव्हा त्याला भानावर आणावे लागे. मग त्याला त्यासाठी थोडा वेळ लागे. मला असा संशय येऊ लागला होता, की तो झेन्टोव्हिक आणि आम्हा सर्वांना विसरून गेला आहे आणि त्याचा शांत वेडेपणा कधीही स्फोट होऊन नाशकारक शारीरिक मारामारीत बदलणार आहे. आणि एकोणीसाव्या खेळीच्या वेळी खरोखरच तशी वेळ आली. त्याची खेळी झेन्टोव्हिकने खेळल्यावर, डॉ बी ने पटाकडे नुसता एक दृष्टीक्षेप टाकून, दांडगटपणे त्याचा वजीर तीन घरे पुढे सरकवला व इतक्या जोराने ओरडला की आम्ही सर्वजण दचकलो.

“चेक! तुझ्या राजाला चेक!”

आम्ही त्या थोर खेळीसाठी, ताबडतोब पटाकडे बघितले. पण क्षणभराने जे घडले, त्यावर आमचा विश्वस बसेना. झेन्टोव्हिकने अगदी हळूहळू त्याचे डोके वर उचलले.व आम्हा सर्वांकडे ओळीने बघितले. [ असे त्याने कधी केले नव्हते. ]

त्याला कसला तरी फार आनंद झालेला दिसत होता. हळूहळू तो आनद व ठळकपणे फसवे दिसणारे हसू त्याच्या ओठांवर आले.

आम्हाला अजूनही न कळलेला त्याचा विजय तो पूर्णपणे साजरा करत होता. त्याने आमच्या गटाला उद्देशून नाटकी नम्रपणे तो आम्हाला सांगितला.

"मला माफ करा --- पण मला काही राजाला चेक दिलेला दिसत नाही. तुमच्यापैकी कुणाला दिसतो आहे का?"

आम्ही पटाकडे बघितले. नंतर पूर्णपणे सुरक्षित अशा झेन्टोव्हिकच्या राजाकडे बघितले. तो वजीरापासून एका सोंगटीच्या अंतरावर होता. [एखादा मुलगाही ते पाहू शकला असता. ] तेव्हा झेन्टोव्हिकच्या राजाला चेक लागलेला नव्हता. आम्ही त्रासून गेलो. आमच्या मित्राने उद्दीपित अवस्थेत चुकीची खेळी खेळली की काय? आमच्या मूकपणाने डॉ बी पटाकडे निरखून बघू लागला आणि आक्रमकपणे चाचरत बोलू लागला,

"पण राजा तर f७ वर हवा होता --- हे चुकीचे आहे. तो कुठे आहे, पूर्णतया चूक. तू चुकीचे खेळलेला आहेस. पटावरील सर्व काही चुकीच्या जागी आहे --- प्यादे g५ वर पाहिजे, g४ वर नव्हे. हा वेगळा खेळ आहे --- हा --- "

तो एकदम तुटून पडला. मी त्याला हातांनी घट्ट धरले. किंवा त्याचा हात इतक्या जोरात पकडला, की त्याच्या तापाच्या संभ्रमातदेखील त्याला माझी पकड जाणवत होती. तो वळला. तो माझ्याकडे एखाद्या झोपेत चालणाऱ्यासारखा बघत होता.

"काय --- तुला काय हवे आहे?

मी फक्त म्हणालो, "आठव." आणि त्याच्या हातावरील चऱ्यावर माझे बोट फिरवू लागलो. तो काही अर्थ न कळून माझ्यासारखेच करू लागला. त्याची नजर रक्तासारख्या लाल ओरखड्याकडे गेली. मग अचानक तो थरथरू लागला. त्याचे पूर्ण शरीर शहारून उठले.

त्याचे ओठ फिके पडले. तो कुजबुजला, "अरे देवा, मी काही चुकीचे बोललो किंवा केले का? --- परत मला काही त्रास होऊ लागला आहे का?"

मी हळूच बोललो, "नाही. पण तुम्हाला हा खेळ ताबडतोब थांबवायला पाहिजे. फार वेळ झाला. डॉकटर काय म्हणाले होते, ते आठवते आहे का?"

डॉ बी लगेच उठून उभा राहिला व झेन्टोव्हिककडे वाकून बघत, पूर्वीच्या नम्र आवाजात बोलला, "माझ्या मूर्खासारख्या

चुकीला माफ कर. मी बोललो, ते चुकीचे होते. हे स्पष्ट आहे, की तू जिंकला आहेस.” मग तो आमच्याकडे वळून बोलला, “मी तुमची माफी मागतो. पण मी तुम्हाला स्पष्ट सांगतो की माझ्याकडून फार अपेक्षा करू नका. मी माझे हसे करून घेतल्याबद्दल, मला माफ करा --- मी यापुढे बुद्धिबळ खेळणार नाही.”

तो वाकून, पहिल्यांदा होता, तसा नम्रपणे व गूढपणे निघून गेला.

मला एकट्यालाच माहिती होते की तो परत बुद्धिबळ खेळणार नाही, असे का म्हणाला. इतर सगळे गोंधळले होते. त्यांनी काही लाजलावणे व भीतीदायक बघायचे हुकवले, असे त्यांना वाटत होते. मॅकोनोर नाराज झाला. तो गुरगुरला, “मूर्ख कुठला!” खुर्चीतून शेवटी उठणाऱ्या झेन्टोव्हिकने अर्धवट पडलेल्या खेळाकडे पाहिले.

तो औदार्याने म्हणाला, “हे दयनीय आहे. त्याचा हल्ला अजिबात चुकलेला नव्हता. एखाद्या नवशिक्या खेळाडूसाठी हा माणूस असामान्यपणे बुद्धिवान आहे.”

## अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बावीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५









डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)













वृषाली जोशी
विश्वकथा१


वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE THE PARTY


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे बाविसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट, अरुण कुळकर्णी(८) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।